# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६४ वे अंक १७२) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२४ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार, दि.०६ जुलै २०२५ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## फरार नीरव मोदीचा भाऊ नेहल मोदीला अमेरिकेत अटक; भारताने केली होती प्रत्यार्पणाची मागणी

नवी दिल्ली दि.५ (वृत्तसंस्था)- हिरे व्यावसायिक नीरव मोदीचा लहान भाऊ निहल मोदीला अमेरिकेत अटक करण्यात आली आहे. अंमलबजावणी संचालनालय (ईडी) आणि केंद्रीय अन्वेषण विभागाने सादर केलेल्या प्रत्यार्पणाच्या विनंतीवरून ही अटक करण्यात आली आहे. पीटीआयने दिलेल्या वृत्तानुसार, ४६ वर्षीय नेहल मोदीला शुक्रवारी ताब्यात घेण्यात आले.

नेहल मोदीला अटक केल्याची माहिती अमेरिकन अधिकाऱ्यांनी भारतीय अधिकाऱ्यांना दिली आहे. १७ जुलै रोजी नेहल मोदीला न्यायालयात सादर केले जाईल, तिथे त्याच्याकडून जामीनासाठी अर्ज केला जाऊ शकतो. मात्र अमेरिकेतील सरकारी वकिल या जामिनाला विरोध करतील, असेही पीटीआयच्या वृत्तात म्हटले आहे.

भारताकडून दोन प्रकरणात प्रत्यार्पणाची मागणी केली गेली आहे. पीएमएले कायद्याच्या कलम ३ नुसार एक मनी लाँडरींगचे प्रकरण आहे. तर भारतीय दंड संहितेच्या कलम १२०-ब आणि २०१ अंतर्गत गुन्हेगारी कट रचणे आणि पुराव्यांशी छेडछाड केल्याचाही आरोप नेहल मोदीवर आहे.

# मराठी एकजुटीवर २० वर्षानंतर उद्धव-राज एकाच मंचावर

## कोणत्याही वादापेक्षा महाराष्ट्र मोठा: मुंबई वेगळी करता येते का, यासाठीच भाषेला डिवचले-राज ठाकरे

मुंबई दि.५ (प्रतिनिधी)- सन्माननीय उद्धव ठाकरे म्हणत राज ठाकरेंनी आपल्या भाषणाला सुरवात केली. आज मोर्चा निघायला पाहिजे होता, मराठी माणूस कसा सर्व बाजूने एकवटतो याचे एक चित्र मोठ्या प्रमाणावर उभे राहिले असते. नुसत्या मोर्चाच्या चर्चेने माघार घ्यावी लागली असे म्हणत राज ठाकरेंनी सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधला आहे.



महाराष्ट्रात महायुती सरकारकडून हिंदी सक्ती लादण्याचा प्रयत्न झाल्यानंतर राज्यात तीव्र संतापाची लाट उसळली. या विरोधात शिवसेना ठाकरे गटाचे उद्धव ठाकरे आणि मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी संयुक्तपणे मोर्चा काढण्याचा इशारा दिला. परिणामी, अवघ्या काही दिवसांत सरकारला हिंदी सक्तीविषयक जीआर मागे घ्यावा लागला. याच पार्श्वभूमीवर आज वरळी डोममध्ये 'विजय मेळावा' पार पडला. मराठी माणसाच्या या दबावामुळे विजय मिळाल्याचे म्हणत दोन्ही ठाकरे बंधू पहिल्यांदाच विजयी मेळाव्या निमित्तने २० वर्षानंतर एका व्यासपीठावर आले.

पुढे बोलताना राज ठाकरे म्हणाले की, मराठी हा मोर्चाचा अजेंडा, कोणत्याही वादापेक्षा महाराष्ट्र मोठा आहे. जे बाळासाहेबांना जमले नाही ते आज घडले. आजचा हा मेळावा शिवतीर्थावर व्हायला हवा होता. संपूर्ण मैदान ओसंडून वाहिले असते. पाऊस असल्याने जागा मिळत नाही म्हणून हा कार्यक्रम इथे करावा लागला.

माझ्या मुलाखतीमध्ये म्हटले होते की, कोणत्याही वादापेक्षा, भांडणापेक्षा महाराष्ट्र मोठा आहे. आज जवळपास २० वर्षांनंतर मी आणि उद्धव ठाकरे एका व्यासपीठावर येत आहोत. जे माननीय बाळासाहेब ठाकरे यांना जमले नाही, जे अनेकांना जमले नाही आम्हाला दोघांना एकत्र आणायचे ते देवेंद्र फडणवीस यांना जमले.

राज ठाकरे म्हणाले की, मुळ विषय सोडून अनेकांना बाकीच्या गोष्टीमध्ये जास्त रस असतो. सायंकाळी (पान ४ वर)



## आमच्या दोघांतील अंतरपाट अनाजीपंतांनी दूर केला; आता आम्ही दोघे मिळून त्यांना फेकून देणार-उद्धव ठाकरे

या मेळाव्यात ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह भाजपवर जोरदार हल्लाबोल केला. उद्धव ठाकरे म्हणाले की, बऱ्याच वर्षानंतर राज आणि माझी राजकीय व्यासपीठावर भेट आहे. सन्माननीय राज ठाकरे असा उल्लेख करतो. राज यांनी अतिशय चांगली मांडणी केली आहे. आज आमच्या भाषणा पेक्षा आमचं एकत्र दिसणं महत्वाचं आहे. आमच्या दोघांतील अंतरपाट अनाजीपंतांनी दूर केला आहे. आता अक्षता टाकायची गरज नाही. एकत्र आलो आहोत, एकत्र राहण्यासाठी, असे म्हणत त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर हल्लाबोल केला.

उद्धव ठाकरे पुढे म्हणाले की, मला आज कल्पना आहे, अनेक बुवा महाराज बिझी आहेत. कोण लिंबू कापतंय, कोण रेडा कापतोय. माझ्या आजोबांनी या भोंदूपणा विरोधात लढा दिला होता आणि त्यांच्यासाठी आम्ही एकत्र आलो आहे. वापरायचं आणि फेकून द्यायचं, असं यांचं काम आहे. आता आम्ही दोघे तुम्हाला फेकून देऊ. तुमच्या डोक्यावर बाळासाहेब ठाकरे यांचा हात नसता तर कुठे असता तुम्ही? मधल्या काळात यांनी सुरू केलं होतं की, उद्धव ठाकरे यांनी हिंदुत्व सोडलं. अरे आम्ही कडवट देशाभिमानी मराठी हिंदू आहोत, असेही त्यांनी यावेळी म्हटले.

महाराष्ट्रात मराठी माणूस न्याय मागत असेल आणि तुम्ही त्याला गुंड म्हणत असाल तर आम्ही गुंड आहोत. देवेंद्र फडणवीस यांच वक्तव्य म्हणजे मला सका पाटलांची आठवण येते, त्यावेळी काँग्रेस सत्तेवर होती. मुंबई आपल्या हक्कांची आहे, (पान ४ वर)

## एकाच्या भाषणात सत्तेची, स्वार्थाची मळमळ दिसली

### एकनाथ शिंदेंचे उद्धव ठाकरेंच्या टीकेला प्रत्युत्तर

मुंबई दि.५ (प्रतिनिधी)- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाकरे बंधुंच्या विजयी मेळाव्यावर प्रतिक्रिया देताना या सोहळ्यावर टीकास्त्र सोडले. राज ठाकरे यांच्या भाषणातून मराठी भाषेबाबतची तळमळ दिसली, पण उद्धव ठाकरे यांच्या भाषणात मात्र केवळ सत्ता, खुर्ची आणि स्वार्थाची मळमळ होती, अशी टीका एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंवर केली. तसेच या मेळाव्यातून मराठी माणसाचा अपेक्षाभंग झाला असल्याचे ते म्हणाले.

उद्धव ठाकरे यांनी आजच्या मराठी विजयी मेळाव्यात भाषण करताना पुष्पा स्टाईलमध्ये उठेगा नहीं साला म्हणज एकनाथ शिंदेवर टीका केली. या टीकेला प्रत्युत्तर देताना, अब उठेगा नहीं साला, हा डायलॉग उद्धव ठाकरेंना शोभून दिसतो, असा टोला एकनाथ शिंदेंनी लगावला. तीन वर्षांपूर्वी दाढीवरून अर्धाच हात फिरवल्याने ते आडवे झाले, अजूनही सावरले नाहीत. आता कुणाचा तरी हात पकडून उठण्याचा प्रयत्न करत आहेत. पूर्ण दाढीवरून हात फिरवला असता, तर काय झाले असते, याचा विचार त्यांनी करावा, अशी टीका उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. फक्त तोंडाच्या वाफा सोडून होत नाही, त्यासाठी मनगटात जोर लागतो, असेही शिंदे म्हणाले.

एकाने मराठीबद्दल असलेली तळमळ बोलून दाखवली. दुसऱ्याने सत्तेसाठी आणि खुर्चीसाठी असलेली मळमळ बोलून दाखवली. झेंडा नाही, अजेंडा नाही असे काही लोक म्हणत होते. पण एका वक्त्याने ते पथ्य पाळले, मात्र दुसऱ्याने स्वार्थाचा झेंडा आणि सत्तेचा अजेंडा रंग शारदेच्या भाषणात निवडणुकीच्या भाषणाप्रमाणे बोलून दाखवला, असा टोला एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंना लगावला.

मराठीबाबत बोलायचे झाले, तर त्यांनी कार्यक्रमाच्या सुरुवातीला (पान ४ वर)

## मराठी भाषेचा अपमान करणाऱ्या सुशील केडिया यांना अखेर उपरती; वक्तव्य मागे घेत मागितली माफी

मुंबई दि.५ (प्रतिनिधी)- मराठी बोलणार नाही, काय करायचे ते करून घ्या, असे वक्तव्य करत महाराष्ट्रामध्ये वादाची ठिणगी टाकणारे मुंबईतील गुंतवणूकदार सुशील केडिया यांनी अखेर माफी मागितली आहे. सुशील केडिया यांचे कार्यालय मनसैनिकांनी आज सकाळीच फोडले होते. त्यानंतर सुशील केडिया यांनी राज ठाकरे यांची माफी मागितली आहे.

या संदर्भात केडिया म्हणाले की, मला माफ करा, माझे वक्तव्य मी मागे घेतो. मात्र राज्यातील खराब झालेले वातावरण ज्यांना शक्य असेल त्यांनी नीट करा, अशी मागणी त्यांनी केली आहे. यासाठी त्यांनी एक व्हिडिओ देखील पोस्ट केला आहे. तसेच सोशल मीडियाच्या माध्यमातून देखील त्यांनी मराठी जनतेची आणि राज ठाकरे यांची माफी मागितली आहे. मनसेच्या कार्यकर्त्यांनी सुप्रसिद्ध व्यावसायिक सुशील केडिया यांचे कार्यालय फोडले आहे. केडिया यांनी परवा एका पोस्टद्वारे मी मराठी बोलणार नाही असे ठणकावून सांगितले होते. तसेच तुम्हाला काय करायचे ते करा असे आव्हानही त्यांनी राज ठाकरे यांना दिले होते. त्यांच्या या विधानामुळे संतप्त झालेल्या मनसैनिकांनी आज सकाळी त्यांच्या कार्यालयावर दगडफेक केली होती.

## मला बाळासाहेबांचे आशीर्वादच मिळत असतील; फडणवीस यांचा ठाकरेंवर पलटवार

पंढरपूर दि.५ (प्रतिनिधी)- राज व उद्धव ठाकरे एकत्र आल्यामुळे बाळासाहेब ठाकरे यांचे आशीर्वादच मलाच मिळतील, अशा उपरोधिक सूरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज व उद्धव ठाकरे यांच्या मनोमिलनावर भाष्य केले आहे. मी राज ठाकरे यांचे आभार मानतो. त्यांनी दोन बंधू एकत्र आणण्याचे श्रेय मला दिले. श्रद्धेय बाळासाहेबांचे आशीर्वाद हे मलाच मिळत असतील. पण मला असे सांगण्यात आले होते की, तिकडे विजयी मेळावा होणार आहे. पण त्या ठिकाणी केवळ रुदालीचे भाषण झाले,



असे ते म्हणाले.

आषाढी एकादशीच्या निमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सध्या पंढरपूरच्या दौऱ्यावर आहेत. त्यांनी तेथील नियोजनाचा आढावा घेत प्रशासनाने केलेल्या तयारीचे तोंड भरून कौतुक केले. आपल्या प्रशासनाने येथे अतिशय उत्तम व्यवस्था केली आहे. आता उद्याचा दिवस अत्यंत महत्त्वाचा आहे. निश्चितपणे यावेळी जशी उत्तम व्यवस्था झाली. आषाढीचे पर्व संपल्यानंतर काही उणिवा राहिल्या काय? हे पुन्हा पाहिले जाईल. पुढच्या वर्षी याहून चांगली व्यवस्था करू, असे ते म्हणाले.

यावेळी पत्रकारांनी त्यांचे राज व उद्धव ठाकरे यांच्या मनोमिलनाकडे लक्ष वेधले. त्यावर फडणवीस उपरोधिकपणे म्हणाले, मी राज ठाकरे यांचे आभार (पान ४ वर)

## लाडक्या बहिणींना जून महिन्याच्या हप्त्याचे वितरण सुरु, आदिती तटकरेंची घोषणा

मुंबई दि.५ (प्रतिनिधी)- महाराष्ट्राच्या महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या जून महिन्याच्या हप्त्याचं वितरण आजपासून सुरु करण्यात येणार असल्याचं सांगितलं आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेला एक वर्ष पूर्ण झालं आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना जुलै २०२४ पासून सुरु करण्यात आली आहे. या योजनेचा १२ वा हप्ता महिलांच्या खात्यात या निमित्तानं जमा होईल. आदिती तटकरे यांनी जून महिन्याच्या सन्मान निधी वितरणाची प्रक्रिया सुरु करण्यात आल्याची माहिती सोशल मीडियावरुन दिली आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील सर्व पात्र लाभार्थ्यांना जून महिन्याचा सन्मान निधी वितरित करण्याची तांत्रिक प्रक्रिया आजपासून सुरू करण्यात आली आहे. योजनेच्या सर्व पात्र लाभार्थ्यांच्या आधार लिंकड् बँक खात्यात उद्यापासून हा सन्मान निधी जमा होणार आहे. महायुती सरकारचा दृढ निश्चय, माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे , उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन व महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींचा दृढ विश्वास या बळावर मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची दमदार वाटचाल यापुढेही अशीच सुरू राहणार हा मला विश्वास आहे.

## जळगाव हादरले! मध्यवर्ती बसस्थानक परिसरात २६ वर्षीय तरुणाला गावठी कट्ट्याचे १२ राऊंड फायर करत संपवले

जळगाव दि.५ (प्रतिनिधी)- जळगावच्या मध्यवर्ती बसस्थानक परिसरात भर दिवसा मोटरसायकलवरून आलेल्या दोन अज्ञात तरुणांनी २६ वर्षीय तरुणावर गावठी कट्ट्याने तब्बल १२ राउंड फायर करत संपवल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे . वाळूमाफिया आणि स्थानिक गटातील संघर्षातून हा खून झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे .या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून मृत तरुणाच्या शरीरावर झाडलेल्या गोळ्यांमुळे त्याच्या शरीराची चाळण झाली होती .आकाश कैलास मोरे असे मृत तरुणाचे नाव आहे . या घटनेचा अधिक तपास सुरू आहे.

प्राथमिक माहितीनुसार, आकाशचा संबंध वाळू उत्खनन आणि वाहतूक व्यवसायाशी असल्याचा प्राथमिक अंदाज आहे.शुक्रवारी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास आकाश बसस्थानक परिसरात उभा असताना दुचाकीवरून आलेल्या दोघांनी त्याच्यावर गावठी कट्ट्यातून १२ राऊंड फायर केले. गोळ्यांच्या माऱ्यामुळे तरुण जागीच कोसळला.

विशेष म्हणजे, दोन दिवसांपूर्वी आकाशने आपल्या सोशल मीडियावर एक स्टेटस व्हिडीओ पोस्ट केला होता. ''शेठ, तुम्ही हवेत गोळ्या मारता, आम्ही थेट छातीवर मारतो...'' अशा भाषेत केलेल्या स्टेटसनंतरच त्याच्यावर जीवघेणा हल्ला झाला. त्यामुळे ही हत्या वैयक्तिक वैरातून झाली की वाळू व्यवसायातील वर्चस्व दाखवण्यासाठी घडवली गेली, याची सखोल चौकशी पोलीस करत आहेत.

आकाशच्या शरीरावर तब्बल १२ गोळ्या लागल्याची माहिती असून, त्याच्या मृतदेहाची स्थिती अत्यंत भीषण होती. घटनास्थळी पोलीस दाखल झाले असून सीसीटीव्ही फुटेज, मोबाईल लोकेशन आणि स्थानिकांकडून माहिती घेऊन आरोपींचा शोध सुरू आहे. पाचोरा शहरात या घटनेनंतर भीतीचं वातावरण पसरले आहे. राज्यात वाळूमाफियांनी पुन्हा डोकं वर काढलं असून यातून होणाऱ्या गुन्हेगारी घटनांमुळे पोलिसांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

## राज्यात वादळी वाऱ्यासह तुफान पावसाचा अंदाज

मुंबई दि.५ (प्रतिनिधी)- अरबी समुद्रात तयार झालेल्या चक्रकार वाऱ्यांमुळे महाराष्ट्रात पावसाचा जोर वाढणार आहे . राज्यात ५ ते ९ जुलै दरम्यान वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. कोकण, मध्य महाराष्ट्रातील घाटमाथ्यावर तसेच मराठवाड्यात बहुतांश ठिकाणी जोरदार पावसाची हजेरी राहील . आज तळ कोकणापासून संपूर्ण किनारपट्टी भागात पावसाचे ऑरेंज अलर्ट आहेत .मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरावर जोरदार पावसाची शक्यता आहे. उत्तर महाराष्ट्र व मराठवाड्यात अनेक ठिकाणी पावसाचा यलो अलर्ट देण्यात आलाय. प्रादेशिक हवामान केंद्र व पृथ्वी मंत्रालयाने एकत्रितपणे जाहीर केलेल्या ताज्या हवामान अंदाजानुसार, ५ जुलै ते ९ जुलैपर्यंत महाराष्ट्रात सर्वदूर पावसाचा इशारा देण्यात आलाय . अरबी समुद्रात तयार झालेल्या चक्राकार वाऱ्यांमुळे पश्चिम बंगाल व आजूबाजूच्या परिसरात कमी दाबाचा पट्टा तयार झालाय . याचा परिणाम महाराष्ट्रावरही होणार असून कोकण, मध्य महाराष्ट्र तसेच मराठवाड्यात पुढील चार दिवस वादळी वाऱ्याच्या पावसाची हजेरी राहणार आहे . यावेळी ४५ ते ५५ किलोमीटर वेगाने वारे वाहतील. रविवार व सोमवार (६ व ७ जुलै) रोजी पुणे घाटमाथ्यावर पुन्हा एकदा रेड अलर्ट देण्यात आलाय. संपूर्ण कोकण किनारपट्टी उत्तर महाराष्ट्र व विदर्भात पुढील चार दिवस पावसाचा जोर वाढणार आहे.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची अध्यापन कारकीर्दही प्रेरणादायी-सरन्यायाधीश भूषण गवई

मुंबई दि.५ (प्रतिनिधी)- विविध विषयांचे अभ्यासक व तज्ज्ञ असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे व्यक्तिमत्त्व विधिज्ञ, अर्थतज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ असे बहुआयामी होते. शिक्षण क्षेत्रातील बहुमोल योगदानाबरोबरच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची अध्यापन कारकीर्दही मोलाची आणि प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन सरन्यायाधीश भूषण गवई यांनी केले.

शासकीय विधी महाविद्यालय येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्राध्यापक आणि प्राचार्य, कारकीर्दीला ९० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त स्मृतीपटलाचे अनावरण आणि सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण आर. गवई यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे, न्यायमूर्ती मनिष पितळे, महाधिवक्ता बीरेंद्र सराफ व प्राचार्य डॉ. अस्मिता वैद्य हे उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यावर व जीवनावर आधारित चित्र प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. शासकीय विधि महाविद्यालयाच्या वतीने मानपत्र देऊन सरन्यायाधीश भूषण गवई



यांचा गौरव करण्यात आला. विविध संस्था तसेच मान्यवरांनीही यावेळी सरन्यायाधीश गवई यांचा गौरव केला.

सरन्यायाधीश भूषण गवई म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे व्यक्तिमत्व व्यासंगी व बहुआयामी होते. ते एक उत्कृष्ट शिक्षक असल्याने त्यांच्या विविध क्षेत्रातील योगदानाबरोबरच त्यांची अध्यापन कारकीर्दही प्रेरणादायी ठरली. शासकीय विधि महाविद्यालयात अध्यापनाचे कार्य करीत असतानाच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजातील दुर्बल घटकांवरील अन्यायाला वाचा फोडण्याचे कार्य सुरू केले. १९३५ च्या गव्हर्मेंट ऑफ इंडिया या ॲक्टमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान मोलाचे ठरले.

शासकीय विधि महाविद्यालयाला देदीप्यमान शैक्षणिक वारसा लाभला असून अनेक विधिज्ञ या महाविद्यालयातून घडले. महाविद्यालयाच्या विविध समित्यांचे वैशिष्ट्यपूर्ण कार्यही अभिनंदनीय आणि अनुकरणीय असल्याचे गौरवोद्गार सरन्यायाधीश गवई यांनी काढले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ज्या महाविद्यालयात अध्यापनाचे कार्य केले त्या ठिकाणी गौरव होणे व शासकीय विधि महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी असल्याचा सार्थ अभिमानाचे असल्याचेही त्यांनी नमूद केले.

प्राचार्य अस्मिता वैद्य प्रास्ताविकात म्हणाल्या, शासकीय (पान ४ वर)

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखीचे दर्शन

पंढरपूर दि.५ (प्रतिनिधी)- आषाढी शुद्ध एकादशी निमित्त वाखरी येथे पोहोचलेल्या आळंदी येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भेट देऊन श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखीचे दर्शन घेतले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यासमवेत पालखी खांद्यावर घेऊन दिंडी सोहळ्यात सहभाग घेतला. टाळ मृदंगआणि विठू माऊलीच्या गजरात वातावरण भक्तीरसात न्हाऊन निघाले. प्रारंभी श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखीचे प्रमुख विश्वस्त योगी निरंजन नाथ यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांचे श्री माऊलींची प्रतिमा देऊन स्वागत केले. वाखरी येथे जिल्हा प्रशासनाने वारकरी, भाविक यांच्यासाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या सोयी-सुविधांची पाहणीदेखील मुख्यमंत्री फडणवीस यांनी केली. वारकऱ्यांसाठी करण्यात आलेल्या सुविधांबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले.



यावेळी आमदार समाधान आवताडे, आमदार गोपीचंद पडळकर, अभिजित पाटील, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पोलीस विशेष महानिरीक्षक सुनील फुलारी, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, महापालिका आयुक्त सचिन ओंबासे, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, माजी आमदार राम सातपुते यांच्यासह हजारो वारकरी भाविक उपस्थित होते.

# भेटीलागी जीवा...

ज्येष्ठ महिना लागायच्या अगोदरपासूनच वारकऱ्यांना वारीचे वेध लागतात. केवळ महाराष्ट्रच नव्हे तर कर्नाटक, गोव्याकडूनही दिंड्या येतात. जगाच्या पाठीवर असा हा अभूतपूर्व व दीर्घ आनंद-सोहळा अन्यत्र कुठेच पाहावयास मिळत नाही. एकदा तरी हा अनुभव सुख-सोहळा 'याचि देही याचि डोळा' भरून पाहावा असे वाटते. दिंडी सोहळा म्हणजे स्त्री- पुरूष- आबालवृद्ध वारकऱ्यांचे आध्यात्मिक संमेलन होय. निरनिराळ्या गावातून 'ईश्वरनिष्ठांची ही मांदियाळी' जागोजागी मुक्काम करत पंढरपुरास पोहोचते. कुणाचेही 'आवतण' आले नसताना उत्स्फुर्त रितीने प्रत्येक वारकरी त्याच्या त्याच्या दिंडीत सहभागी होतो, ते एका अतूट अशा विठ्ठलभक्तीच्या धाग्याने.

'या रे या रे सान थोर' अशी हाक तुकाराम महाराजांनी घातल्यावर जाती-पंथ, लहान-थोर, उच्च-नीच हे भेदाभेद येथे गळून पडतात. उरतो तो एकच अव्दैत भाव. त्यामुळेच अवघा जनसागर या टाळ-मृदूंगांच्या भक्तीच्या प्रवाहात सामील होतो. टाळ-मृदुंग गर्जती, माझ्या विठ्ठलाची प्रीती' याचे प्रत्यंतर इथे सापडते. खरोखरच अचेतनाला चैतन्याची पालवी फुटलेली पाहावयास मिळते. प्रत्येकाच्या हातात टाळ, मुखी नाम घोष, खांद्यावर भागवत धर्माची पताका, तर काही स्त्रियांच्या डोईवर तुळस-वृंदावन घेतलेले दिसते. जनी म्हणते तसे 'अवघा रंग, एक झाला! रंगी रंगला श्रीरंग' अशी बेभान अवस्था त्या वारकऱ्यांची होते. हा सोनियाचा दिनू पाहावयास आतुर झालेले वारकरी माऊलीच्या समवेत, संतांच्या मांदियाळीबरोबर पावले टाकताना 'माऊली माऊली, ज्ञानोबा माऊली तुकाराम' या मंत्राचा अखंड जप करीत मार्गक्रमण करतात. माऊलींच्या संगतीत असल्याने त्यांना ऊन -वारा, पाऊस-पाणी याची तमा नसते. 'माझ्या जीवीची आवडी' कोणती तर 'पंढरपुरा नेईन गुढी' असे ज्ञानोबा म्हणतात ते उगीच नाही. सगळीकडे अवतीभवती सगुणाचा साक्षात्कार दिसतो, सदाचाराचा, सत्संगाचा आचार आढळतो आणि मग अवघाची संसार सुखाचा व्हावयास वेळ नाही लागत. त्यासाठी या भक्तिमार्गावरून विठ्ठलाच्या पंढरपुरी जावे, नाम घोषात दुमदुमलेली पंढरी डोळे भरून पाहावी. 'माझे माहेर पंढरी' असे म्हणणाऱ्या एकनाथांनीसुद्धा संसार सोडला नाही हे वास्तव जीवन-सासर सोडून माहेरी जाण्याची त्याला भेटण्याची ओढ अंतरी लागते. 'भेटी लागी जीवा लागलीसे आंस' अशी अवस्था होते. तुम्ही-आम्ही परीट घडीचे प्रवासी आम्हाला हे अशक्य वाटते. एवढा अठरा-वीस दिवसांचा जवळजवळ अडीचशे कि.मी.चा प्रवास शक्य नाही असेच वाटते. परंतु खरं सांगायचं तर त्याची कृपा असल्यावर दृढ निष्ठा असल्यावर 'पंगुम् लंघयतेत् गिरीम्' हेच खरे वाटते. 'जेथे जातो तेथे तू माझा सांगाती! चालविसे हाती धरूनिया' अशीच अवस्था होते.

वारीचे वैशिष्ट्य म्हणजे वारीची प्रचंड शिस्त, वस्तुत: येथे कुणी पगारदार नोकर वगैरे नसतात. परंतु याच्या मुळाकडे लक्ष घातल्यावर आढळते ते असे की, पूर्वीपासून हा पालखी सोहळा होताच. पायी वारी होती. कित्येक घराण्यात आजही ती चालू आहे. परंतु आजचे हे वैभवाचे, दिमाखाचे स्वरूप कै. हैबतबाबा आरफळकर या सैनिकी बाण्याच्या शिलेदाराकडून प्राप्त झाले आहे. प्रत्येक दिंडीची योजनापूर्वक आखणी, कामाचा व्याप बघता सर्वांनी शिस्तीने, एकीने वागल्यास दुजाभाव उरतोच कुठे? आजच्या एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकाची पायवाट करताना भले आपण निरनिराळ्या ग्रहांवर पाऊल ठेवले असेल. एकीकडे यांत्रिकतेमुळे जग जवळ आले आहे; पण माणूस-'माणूसपण' हरवून बसला आहे. त्याचे सुख-दु:ख ऐकायला, ते दूर करावयास कुणालाच सवड नाही. आज आपण मी कोण, कशासाठी आलो याचा विचारच करत नाही. सगळीकडेच 'आत्मकेंद्रीवृत्ती' आढळून येते. पैसा-त्याच्याच मागे सारीच धडपड, बुद्धीवादी जगता प्रमाणे भावजगतही आहे. भावेविण भक्ती, भक्तीविणा मुक्ती, बळेविण शक्ती बोलू नये असे माऊलींनी म्हटले आहेच. विश्वात्मक देवाला पाहण्यासाठी माऊलींनी जो भक्तीचा साधासुधा सोपान दाखवला, अनुभवला त्याच मार्गावरून आपणही गेल्याने वाईट तर नक्कीचं होणार नाही. झालं तर चांगलंच होईल. माऊलीचे बोट मात्र सोडता कामा नये. विठोबाची आण घेऊन तुकाराम महाराज म्हणतात, 'तुको म्हणे सोपे आहे सर्वांहूनी! शहाणा जोधनी घेतो येथे'. 'पंढरीच्या या भुताने झपाटले' असे झाल्यावर मीपण उरले कुठे?

# रेल्वे भाडेवाढ सामान्य जनतेवर अन्यायकारक -डॉ.हुलगेश चलवादी

पुणे, दि. ४ (प्रतिनिधी) –बहुजन समाज पार्टीच्या (बसपा) राष्ट्रीय अध्यक्षा, उत्तर प्रदेशच्या माजी मुख्यमंत्री सुश्री मायावती जी यांनी केंद्र सरकारच्या धोरणांवर कठोर टीका केली आहे.सध्या देशात वाढती महागाई, बेरोजगारी आणि गरीबांचे मोठ्या प्रमाणावर शहरांकडे स्थलांतर सुरू असताना रेल्वे भाड्यांमध्ये वाढ करणे हे जनतेच्या हिताची पायामल्ली करणारे आहे, अशा शब्दात सुश्री बहन मायावती जी यांनी सरकारच्या निर्णयावर नाराजी व्यक्त केल्याची

माहिती पक्षाचे प्रदेश महासचिव, पश्चिम महाराष्ट्र झोन मुख्य प्रभारी डॉ.हुलगेश चलवादी यांनी गुरुवारी (ता.३) दिली.

शोषित, पीडित, उपेक्षित, वंचित घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आण्याचा मानस सरकारचा नसल्याचे यावरून पुन्हा एकदा अधोरेखित होत असल्याचे मत डॉ.चलवादी यांनी व्यक्त केले. रेल्वे भाडेवाढ सर्वसामान्यांसाठी अन्यायकारक आहे, असे डॉ. चलवादी म्हणाले.केंद्र सरकारकडून 'राष्ट्र प्रथम' या नावाखाली जीएसटीप्रमाणेच रेल्वेमार्गेही सामान्य नागरिकांवर आर्थिक ओझं टाकलं जात आहे. ही प्रवृत्ती लोकशाही आणि संविधानाच्या कल्याणकारी तत्त्वांसाठी मारक आहे. अशा निर्णयांचा फटका देशातील गोरगरीब, कामगार आणि मध्यमवर्गीय नागरिकांना मोठ्या प्रमाणावर बसतोय,अशा शब्दात डॉ.चलवादी यांनी बसपची भूमिका स्पष्ट केली.

गरिबांच्या जीवनशैलीत सुधारणा होईल, अशा पद्धतीने योजनांची आखणी करावी.केवळ निवडक श्रीमंत, उद्योगपतींच्या हितासाठी निर्णय घेणे हा अयोग्य दृष्टिकोन असल्याचा सल्ला देखील बसपा ने केंद्र सरकार ला दिला आहे.दैनंदिन उपभोग्य वस्तूंच्या वाढत्या किमतींमुळे नागरिकांचे जीवन कठीण होत आहे. त्यातच उत्पन्न घटल्यामुळे लोक 'अच्छे दिन' येण्याची वाट पाहत आहेत, असे म्हणत त्यांनी सरकारवर उपरोधिक टोला लगावला. सध्या देशात कोट्यवधी लोक गरिबी, महागाई, बेरोजगारीमुळे गावे सोडून शहरांत स्थलांतर करत आहेत.या काळात रेल्वेप्रवास हे त्यांच्यासाठी आवश्यक साधन आहे, परंतु भाडेवाढीमुळे तोही खर्चिक बनतो आहे. सरकारने अशा गरजू नागरिकांप्रती सहानुभूतीपूर्वक, कल्याणकारी दृष्टीकोनातून निर्णय घ्यावा,अशी मागणी सुश्री बहन मायावती जी यांनी केल्याचे डॉ.चलवादी म्हणाले.

# भगवान विठ्ठल ब्रम्हांडाचे पालनहार.

**पांडुरंग** हे विष्णुचा अवतार आहे. त्यामुळे ते संपूर्ण सृष्टीचे पालनहार आहेत. परंतु महाराष्ट्रातील मराठी माणसासाठी विष्णू हे पांडुरंगाच्या(विठ्ठलाच्या)रूपात खरं तर महाराष्ट्राचे कुल दैवत आहे.आषाढ महिना हा विठ्ठलाच्या गजरात तल्लीन असतो.जनुकाय साक्षात विठ्ठल प्रगट झाल्याचे आपल्याला संपूर्ण महाराष्ट्रात दिसुन येते. महाराष्ट्रातील संतांच्या ह्रुदयात स्थान असणारे अवघ्या महाराष्ट्राचे दैवत म्हणजे पंढरपूरचा विठोबा.मराठी वर्षांच्या आषाढ महिन्याच्या शुद्ध पक्षात जी एकादशी येते तिला आषाढी किंवा देवशयनी एकादशी असेही म्हणतात.याच एकादशीला महाएकादशी असेही म्हणतात. त्यामुळे या एकादशीला घरातील प्रत्येक लहान-मोठे व्यक्ती उपवास करून विठुरायाच्या चरणी पुजा-अर्चना करून नतमस्तक होऊन आपली मनोकामना पूर्ण करण्यासाठी आराधना करतात.वर्षातील एकूण २४ एकादशी पैकी आषाढी एकादशीला आगळेवेगळे महत्व आहे.कारण याच एकादशीला महाराष्ट्रातील लाखो भाविक, वारकरी वारी घेऊन पंढरपूरला जातात व प्रत्येकांना वाटते की जीवनात एकदा तरी वारी अनुभवावी म्हणजे आपण समजू शकतो की वारीचे दर्शन म्हणजे साक्षात पांडुरंगाचे दर्शन.महाराष्ट्राला संतांची भूमी संबोधले जाते.कारण महाराष्ट्रात संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत एकनाथ, संत जनाबाई, संत मुक्ताबाई यांच्या सारख्या महान संतांनी संत परंपरेचा वारसा जोपासला आहे. कोणी लहान नाही,कोणी मोठा नाही, सगळे समान व सारखे अशी समतेची भावना सर्व संतांनी लोकांच्या मनात रूजवीली आहे. त्यामुळेच आज संपूर्ण भारतात महाराष्ट्राला संतांची भूमी म्हणून संबोधले जाते.आजही संपूर्ण महाराष्ट्रात संतांचा वारसा दिसून येतो. ही महाराष्ट्रासाठी स्वाभिमानाची गोष्ट आहे.असेही म्हणतात की आषाढी एकादशी पासून चातुर्मासाची सुरूवात होते व आषाढी एकादशीला भगवान विष्णू शेष नागावर निद्रास्थ होतात आणि चातुर्मासानंतर कार्तिकेय एकादशीला जागे होतात.आषाढी एकादशीला आळंदीवरून ज्ञानेश्वराची, देहू वरून तुकारामाची, त्र्यंबकेश्वर येथुन संत निवृत्तीनाथांची, उत्तर भारतातून संत कबीर यांची,तर पैठणवरून एकनाथ महाराजांची पालखी पंढरपूरला विठोबाच्या दर्शनासाठी येतात. या पालख्यांबरोबर सर्व भाविक पायी विठू नामाचा गजर करत पंढरपूरला पोहचतात. एकादशीच्या दिवशी भाविक पहाटे उठून चंद्रभागेच्या तीरी स्नान करतात व तुळस वाहून विठ्ठलाची पुजा-अर्चना करतात.विठ्ठल म्हणजे साक्षात विष्णूचाच अवतार आहे.



विठ्ठलाच्या चरणी मस्तक ठेवुन संपूर्ण भाविक मानवजातीच्या कल्याणासाठी आणि येणारे विघ्न दूर व्हावे यासाठी साकडे घालतात व राज्य सुजलाम सुफलाम होण्याची मनोकामना करतात. पौराणिक कथांमध्ये सुध्दा आषाढी एकादशीचा उल्लेख दिसून येतो.मृदुमान्य नावाच्या एका राक्षसाने भगवान शंकराची उपासना करून त्यांना प्रसन्न केले व मला मरण येणार नाही असा वर शंकरजी जवळुन मागुन घेतला.अशा परिस्थितीत मृदुमान्य राक्षसाने संपूर्ण देवतांवर विजय मिळिवण्याचा निश्चय केला.अशा परिस्थितीत मृदुमान्य राक्षसाने ब्रम्हा,विष्णू आणि महेश यांचा शोध घेणे सुरू केले. अशावेळी ब्रम्हा, विष्णू, महेश एका गुहेत तीन दिवस लपून बसले.या तिघांच्या एकवटलेल्या श्वासापासुन एकादशी देवता उत्पन्न झाली व तिने मृदुमान्य राक्षसाचा वध केला.हीच ती आषाढी एकादशी होय.या दिवसांपासून चातुर्मास सुरू होतो. असा उल्लेख आपल्याला पुराणांमध्ये पहायला मिळते. विदर्भाचे पंढरपूर म्हणून धापेवाड्याची २८४ वर्षांची ओळख आहे.आजही आपल्याला आषाढी एकादशी पासून तर गुरूपौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी पर्यंत (आखाडीच्या दुसऱ्या दिवसांपर्यंत) धापेवाड्याला भव्य यात्रा दिसून येते. धापेवाड्याचे पांडुरंगाचे परमभक्त श्रीसंत कोलबाजी महाराज दरवर्षी पंढरपूरची वारी करून पांडुरंगाचे दर्शन घ्यायचे. त्यानंतर वृद्धापकाळाने कोलबाजी महाराज पंढरीची वारी करून शकले नाही याची खंत त्यांना वाटु लागली.ते विठ्ठलाचे परमभक्त असल्याने पांडुरंगाला आपल्या परमभक्ताची चिंता वाटायला लागली.अशा परिस्थितीत पांडुरंग श्रीसंत कोलबाजी महाराज यांच्या स्वप्नात येऊन पांडुरंगाने सांगितले की हे माझ्या परम भक्ता तु माझ्या पर्यंत येवू शकत नाही हे मला समजते.त्यामुळे मी स्वतः तुझ्या भेटीसाठी धापेवाड्याला येत आहे.असे पांडुरंगाचे बोलने ऐकुण श्रीसंत कोलबाजी महाराजांनी स्वतः ला धन्य मानले व पांडुरंग धापेवाडास्थीत चंद्रभागेच्या काठाच्या विहीरीत स्वयंभू विठ्ठलमूर्तीच्या रूपात गुरूपौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे आषाढी पौर्णिमेच्या प्रतिपदेला प्रकट झाले. अशी आख्यायिका आहे. दरवर्षी आषाढ महिन्यात एकादशीच्या पाचव्या दिवशी म्हणजे गुरूपौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी धापेवाड्याला साक्षात पांडुरंग येतात.त्यामुळे धापेवाड्याला पांडुरंगाच्या दर्शनासाठी गुरूपौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी भक्तांची भव्य यात्रा आपल्याला पहायला मिळते.देवतांवर विजय मिळिवण्यासाठी मृदुमान्य राक्षसाने ब्रम्हा,विष्णू, महेश यांचा शोध घ्यायला सुरुवात केली.अशा परिस्थितीत हे तिन्ही देवता एका गुहेत तीन दिवस लपून बसले.यांच्या श्वासातून एकादशी देवता निर्माण झाली व मृदुममान्य राक्षसाचा वध केला.असे पुराणात आहे.हीच गोष्ट आज आपल्याला लागू होते.आज पृथ्वीवरील संपूर्ण जीवजंतूसाठी श्वास (ऑक्सिजन) ची जोपासना करणे गरजेचे आहे यासाठी वृक्ष लागवड अत्यंत आवश्यक आहे. आज महाराष्ट्र अनेक दऱ्या, डोंगर व बंजार जमीन आहे.या संपूर्ण ठिकाणी मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करणे गरजेचे आहे. आपण पहाल की करोना काळात संपूर्ण जग ऑक्सिजनसाठी धडपडत होते.म्हणजे ऑक्सिजनला किती महत्त्व आहे ते आपल्याला करोनाने चांगल्याप्रकारे शिकविले.याकरीता पृथ्वीला व पृथ्वीवरील जीवसृष्टीला वाचविण्यासाठी सावधगिरीचे उपाय म्हणून घर तीथेच झाड,बंजार जमीन, गडकिल्ले या संपूर्ण ठिकाणी आषाढी एकादशीच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड व्हायला हवी.यासाठी मुख्यत्वेकरून सरकारने, सर्वसामान्यांनी,सरकारी अधिकाऱ्यांनी, राजकीय पुढाऱ्यांनी, सामाजिक संघटनांनी पुढाकार घेऊन वृक्षलागवडीला महत्त्व दिले पाहिजे.यामुळे गुरांना चारा व संपूर्ण जीवसृष्टीला ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल.कारण आज जंगल संपदा वाचविने काळाची गरज आहे. कारण प्रत्येक झाडात,पानांत, फुलात व फळात आपल्याला खऱ्याअर्थाने विठ्ठलाचे दर्शन घडल्याचे दिसून येईल.त्यामुळे आता सर्वांनीच वृक्ष लागवड करून काय डोंगर, काय झाडी, काय हिरवळ गालीचा सम्द ओके करून प्रदूषणावर मात करायला हवी.जय हरी विठ्ठल! पांडुरंग हरी!

**– रमेश कृष्णराव लांजेवार**
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)

## पंढरी

माय बापाच्या सेवे परी
नाही दुजी पंढरी
नाही दुजा श्रीहरी
एकादशीला पंढरपुरी
विठ्ठल दर्शनाचे महत्त्व भारी

आषाढी कार्तिकीच्या वारीत
लाखो भक्तांच्या भक्तीत
समभाव मनात
दिंड्या चालतात पुढील मुक्कामात

पंढरीचा विठ्ठल भारी दैवत
महाराष्ट्राचे भूषण पंढरीच्या वैभवात
पंढरीचा विठ्ठल श्रीहरीचे रूप
'उभा विटेवरी कर कटेवरी' शोभते खूप

विठू नामात शक्ती अद्भुत
समभावाच्या वारी अनुभवात
भक्तीच्या अथांग सागरात
जीवन अनुभूतीत

तळपायात अंगार
दर्शनासाठी अधीर
गाठतात पंढरपूर
करत ज्ञानबा तुकारामाचा गजर

दिंड्या होती गोळा
चंद्रभागे तिरी वारकयांचा मेळा
स्नान संध्या आटपून कपाळा
कुंकू बुक्का चंदन टिळा

ज्ञानियांचा राजा संत ज्ञानेश्वर
ज्ञानेश्वरी ग्रंथ रचिता संत
थोर भगवद्गीतेचे प्राकृतात रूपांतर
ज्ञानमार्ग झाला सुकर

संतश्रेष्ठ तुकाराम महाराज
जगद्गुरु परम विठ्ठल भक्त
तुका म्हणे
भक्ती मार्ग इशभजन कीर्तनात
'ईशसंग हे जीवनांग'

तुका झळके कळसात
वारकरी संप्रदायात
राहून प्रपंचात
नाव मोठे संत साहित्यात
तुकारामाच्या गाथा अभंग कविता
साहित्य शिक्षणाच्या अभ्यासात
पंढरीनाथाच्या भक्ती वैभवाचा सोहळा
जगी नाही दुजा असा वारकरी भक्तांचा मेळा.

**– डॉ. अलका मधुकर काथार**

# आषाढी एकादशीचे

महाराष्ट्र ही संत-महंतांची भूमी आहे. या राज्यात थोर संतांनी आपल्या अमृत वचनातून जी अमृत पेरणी केलेली आहे. ती आजही टिकून आहे.देशात व राज्यात विविध सण व उत्सव मोठ्या उत्साहात साजरे केले जातात.या सण व उत्सवातून महाराष्ट्र राज्यात अध्यात्मिक परंपरा टिकून आहे. आषाढ महिन्यातील वारकरी संप्रदायाचा आनंदोत्सव म्हणजे पंढरपूरची आषाढी एकादशी होय. पंढरपूरचे दैवत विठ्ठल म्हणजे

साक्षात भगवान विष्णुचे अवतार होय. भगवान विष्णु या भूतलावरील समस्त सजीवांचे पालनकर्ता होतं. या विठ्ठलाच्या दर्शनासाठी केवळ राज्यातूनचं नव्हे तर संपूर्ण देशातून थोर संत महातम्यांच्या पायी पालख्या आषाढीच्या एक महिना आधी पंढरपूरला यावयास सुरुवात होते. या पायी पालखी फेरीत सर्व जाती,धर्म,पंथ,संप्रदायाचे भक्त-भाविक ,वारकरी एक दिलाने संघटित होऊन पंढरपुरी जाऊन विठ्ठलाच्या चरणी माथा टेकून सर्व जनता-जनार्दन सुखी, समृद्ध, आनंदी, निरोगी ठेवण्यासाठी प्रार्थना करतात.बळीराजासाठी भरपूर पाऊस व शेती उत्पादन साठी प्रार्थना करतात.

## आषाढी एकादशी

आषाढी एकादशीचा किती वर्णावा सोहळा
विठुरायांच्या पंढरीचा भक्तांना असे लळा
पायी दिंडीने जातो महाराष्ट्र वारकरी
म्हणतो आम्ही सर्व पंढरीचे वारकरी
आषाढी एकादशीला असे विठ्ठल माऊलीचे दर्शन
किती-किती करावे पंढरी प्रसंगांचे वर्णन
विठुरायाच्या दर्शनाने वारकरी सुखावतो
महाराष्ट्र कल्याणार्थ विठुला प्रार्थना करतो
आषाढी एकादशीची महान असे थोरवी
साऱ्यांच्या तोंडी विठू नामाची गोडवी

**–धोंडीरामसिंह राजपूत**

पंढरपूर नगरी विठ्ठल नामाने, भंजन, टाळने गुगुण जाते.महिला-पुरुष चंद्रभागेच्या तीरावर वालुकामय जागी विठ्ठल नामात तल्लीन होतात. पांडुरंगाला अनाथाचा नाथ संबोधतात,या नाथाच्या दर्शनासाठी व्याकुळ झालेले भक्त,वारकरी पांडुरंगाच्या चरणी लीन होऊन व्यथामुक्त होण्यासाठी प्रार्थना करतात.आषाढी एकादशी म्हणजे स्नेह, आपुलकी, सदभाव, सदविचार, सदसंगत व सदगुणांचा महोत्सव होय.ज्ञानदेवापासून

वारकरी संप्रदायाचा जन्म झाला व संत तुकाराम महाराजांनी कळस रचला असे मानले जाते.या संप्रदायाने सर्वांना समान मानलेले आहे.शुद्ध मनाने,निमर्ळ मनाने भगवंताचे नाम स्मरण करून

काया-वाचा-व मन भगवंताला अर्पण करणे,हेच भागवत धर्माचे सार आहे. अशा या पावन व पवित्र आषाढी एकादशी दिनी साधी, सरळ,व शुद्ध मनांची माणसे,भक्त,भाविक एकत्र येऊन पंढरीच्या विठ्ठलाशी एकरूप होतात,व विठ्ठलाला अनेक गोष्टीचे साकडे घालतात.गावो-गावीचा हा सर्वांग सुंदर मेळा पाहून विठ्ठल ही निश्चितच प्रभावित होत असतील यात शंका नाही.व भक्तांची मनोभावना ओळखून ती पूर्ण करतो असे मानतात. विठ्ठला या वर्षी भरपूर पाऊस दे!बळीराजा सुखाऊ दे! इर्ळा-पिळा टळू दे! व महाराष्ट्र व देश सुखाऊ दे!हीच तुमच्या चरणी प्रार्थना.

**– धोंडीरामसिंह राजपूत**

# आषाढी एकादशी-इतिहास आणि महत्त्व

आषाढी एकादशी म्हटले की, डोळ्यांसमोर येते, ती पंढरपूरची वारी ! वर्षभरातील २४ एकादशांमध्ये या एकादशीचे एक विशेष महत्त्व आहे. या दिवशीच्या व्रतात सर्व देवतांचे तेज एकवटलेले असते. आषाढी एकादशी या व्रतामागील इतिहास आणि तिचे महत्त्व तसेच पंढरपूरची वारी याविषयीची माहिती सनातन संस्थेद्वारा संकलित केलेल्या लेखातून जाणून घेऊया.

१. प्रकार – आषाढ मासाच्या शुक्ल पक्षातील एकादशीला 'देवशयनी (देवांच्या निद्रेची)' आणि वद्य पक्षातील एकादशीला 'कामिका एकादशी', असे म्हणतात.

२. इतिहास – 'पूर्वी देव आणि दानव यांच्यात युद्ध पेटले. कुंभ दैत्याचा पुत्र मृदुमान्य याने तप करून शंकराकडून अमरपद मिळवले. त्यामुळे तो ब्रह्मदेव, विष्णु, शिव अशा सर्व देवांना अजिंक्य झाला. त्याच्या भयाने देव त्रिकुट पर्वतावर धात्री (आवळी) वृक्षातळी एका गुहेत दडून बसले. त्यांना त्या आषाढी एकादशीला उपवास करावा लागला. पर्जन्याच्या धारेत स्नान घडले. अकस्मात त्यांच्या सर्वांच्या श्वासापासून एक शक्ती उत्पन्न झाली. त्या शक्तीने गुहेच्या दाराशी टपून बसलेल्या मृदुमान्य दैत्याला ठार मारले. ही जी शक्तीदेवी, तीच एकादशी देवता आहे.

३. महत्त्व – आषाढी एकादशी व्रतात सर्व देवतांचे तेज एकवटलेले असते. कामिका एकादशी ही मनोकामना पूर्ण करणारी एकादशी आहे. ही पुत्रदायी एकादशी आहे.

४. व्रत करण्याची पद्धत – आदल्या दिवशी दशमीला एकभुक्त रहायचे. एकादशीला प्रातःस्नान करायचे. तुलसी वाहून विष्णुपूजन करायचे. हा संपूर्ण दिवस उपवास करायचा, रात्री हरिभजन करत जागरण करायचे. आषाढ शुद्ध द्वादशीला वामनाची पूजा करायची आणि पारणे सोडायचे. या दोन्ही दिवशी 'श्रीधर' या नावाने श्रीविष्णूची पूजा करून अहोरात्र तुपाचा दिवा लावण्याचा विधी करतात.

५. एकादशीचे व्रत कसे करावे ? 'एकावर एक ११ म्हणजे एकादशी. याचा अर्थ एकत्व सोडू नये. या दिवशी लंघन करणे, उपवास करणे, याचा उद्देश आहे, लक्ष तिकडे न जाता भगवंताकडे रहावे. मात्र आता हा अर्थ गौण झाला आहे आणि उपवास प्रधान झाला आहे ! या दिवशीचे तत्त्व साधना करण्याला अनुकूल असते. एकादशी प्रतिदिनच केली पाहिजे; मात्र एक दिवस योग्य तर्हेने केल्यास त्याचा प्रभाव १५ दिवस टिकतो; म्हणून एका मासात २ एकादशी असतात.' – परात्पर गुरु परशराम पांडे महाराज

६. पंढरपूरची वारी – अदृश्य भगवंताच्या अस्तित्वाचा एक भक्कम पुरावा म्हणजे पंढरपूर ! वैकुंठभुवनाच्या आधीपासून पंढरपूर अस्तित्वात आले. त्यामुळे पृथ्वीवरील सर्वांत पुरातन तीर्थक्षेत्र म्हणून पंढरपूरचा उल्लेख केला जातो. त्यासंदर्भात एक ओवी आहे, आधी रचिली पंढरी, नंतर वैकुंठ नगरी । संत नामदेव महाराजही आपल्या अभंगात सांगतात, जेव्हा नव्हते




चराचर, तेव्हा होते पंढरपूर ! पृथ्वीवरील केवळ दोनच तीर्थक्षेत्रे नाश न पावणारी आहेत. एक म्हणजे काशी आणि दुसरे म्हणजे पंढरपूर, कारण या क्षेत्रांचा अविनाशी तत्त्व असा महिमा भगवान शंकर आणि विष्णु यांनी आपल्या अखंड वास्तव्याने कथन केला आहे. काशीमध्ये शंकराचे आणि पंढरपूरमध्ये विष्णूचे स्थूल रूपात अस्तित्व आहे; म्हणूनच प्रत्येक हिंदू इहलोकाची यात्रा संपवण्यापूर्वी एकदा तरी काशीस अथवा पंढरपूरला जावे, अशी इच्छा बाळगून असतो. सप्तपुर्यांपेक्षाही थोरवी प्राप्त झालेले हे पंढरपूर आहे.

**'बोलावा विठ्ठल पहावा विठ्ठल ।**
**करावा विठ्ठल जीवभाव ?'**

या अभंगाची प्रचीती आज प्रत्येक वारकरी आणि विठ्ठल भक्त घेत नित्यनेमाने घेत असतो. नव्हे, तर पंढरीचा विठ्ठल हा वारकयांचा श्?वासच आहे. त्याच्या नामाविना त्यांचे कोणतेच कर्म होत नसते. अशा भगवद्भक्त असलेल्या वारकयांचा महासंगम पंढरपूर यात्रेच्या म्हणजेच वारीच्या निमित्ताने होत असतो.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर यंदाच्या वर्षी जरी काही वारकयांना पंढरपूरला जाता आले नाही, तरी प्रत्येक वारकरी मनातून विठ्ठलाला आळवत समष्टी कल्याणासाठी कोरोनाचे संकट दूर करण्यासाठी प्रार्थना करत असेल, हेही निश्चित !

प्रत्येकाचे कल्याण चिंतणे, कार्यात भगवंताला पहाणे, धर्मपूर्वक गृहस्थाश्रमाचे पालन करणे आणि भागवतधर्माचा मार्ग सुकर करणे हेच वारकयांचे भक्तीमय जीवन असते ! आषाढी एकादशीनिमित्त विठ्ठलाचा नामजप आणि उपासना करून एकादशी व्रताचा आध्यात्मिक लाभ घेऊया.

– संदर्भ : सनातन संस्थेचा ग्रंथ 'सण, धार्मिक उत्सव आणि व्रते'

– संकलन– श्री. दत्तात्रेय वाघूळदे, सनातन संस्था

# आता रेल्वे इंजिनांची निर्यात

**कधी** काळी तंत्रज्ञान आणि मोठमोठ्या सुविधांसाठी परदेशावर अवलंबून असलेला भारत आता तंत्रज्ञानाचा आणि पायाभूत सुविधांचा वापर करून जगाला मोठ्या प्रमाणात निर्यात करायला लागला आहे. केवळ मागास देशांनाच नव्हे, तर प्रगत देशांनाही भारताच्या रेल्वे इंजिनांची निर्यात व्हायला लागली आहे. जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान, टिकाऊपणा आणि किंमत या सर्वांबाबत भारत आता जगाशी स्पर्धा करत आहे.

गुजरात आणि बिहार या दोन राज्यांच्या प्रगतीमध्ये प्रचंड तफावत असली, तरी दोन राज्यांनी आता एकाच क्षेत्रात मोठी आघाडी घेतली आहे. हे क्षेत्र म्हणजे रेल्वे इंजिनांची निर्यात. भारताने पश्चिम आफ्रिकेला शंभरहून अधिक 'हाय-टेक लोकोमोटिव्ह' निर्यात करण्यास सुरुवात केली आहे. बिहारमध्ये 'मेक इन इंडिया' उपक्रमांतर्गत बांधलेले हे लोकोमोटिव्ह इंजिन चालकांच्या सोयीसाठी जागतिक दर्जाच्या सुविधांनी सुसज्ज आहेत. बिहारमधील पाटण्याजवळील मारहोरा रेल कारखान्यात अमेरिकेच्या वेबटेकिन आणि भारतीय रेल्वेच्या संयुक्त उपक्रमातून रेल्वे इंजिने तयार केली जात आहेत. दहा वर्षांमध्ये एक हजार शक्तिशाली मालवाहतूक लोकोमोटिव्ह तयार करण्याच्या सामंजस्य करारांतर्गत २०१५ मध्ये मारहोरा रेल कारखाना स्थापन करण्यात आला. 'वॅबटेक'ने २०१८ मध्ये पहिले इंजिन दिले. त्यानंतर या कारखान्यातून ७०० हून अधिक इंजिने बनवण्यात आली आहेत. बिहारमधील मारहोरा डिझेल लोकोमोटिव्हमधून आता भारत १५० इव्होल्यूशन सिरीज ४३ लोकोमोटिव्ह निर्यात करणार आहे. १५० लोकोमोटिव्हची ऑर्डर तीन हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. ती जागतिक स्पर्धात्मक बोलीद्वारे घेण्यात आली. आफ्रिकेतील गिनी या देशाला रेल्वे इंजिनाची पहिली खेप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत पाठवण्यात आली. तीन वर्षांमध्ये दीडशे इंजिने पाठवायची आहेत. या आर्थिक वर्षात त्यापैकी ३७, पुढील वर्षी ८२ आणि तिसऱ्या वर्षी ३१ इंजिने पाठवली जातील.

या मोहिमेतील साडेचार हजार अश्वशक्तीच्या लोकोमोटिव्हमध्ये एसी प्रोपल्शन, रीजनरेटिव्ह ब्रेकिंग, मायक्रोप्रोसेसर-आधारित नियंत्रणे आणि देखभाल आणि अपग्रेडच्या सोयीसाठी मॉड्यूलर आर्किटेक्चर आहे. प्रत्येक लोकोमोटिव्ह उच्च दर्जाच्या उत्सर्जन मानकांची पूर्तता करते आणि त्यात एसी कॅब आहे. ही इंजिने अग्निशमन प्रणाली आणि पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाने सुसज्ज आहे. केबिन आधुनिक आणि अर्गोनॉमिक आहेत. त्यात रेफ्रिजरेटर, मायक्रोवेव्ह आणि पाणी न लागणाऱ्या शौचालय प्रणालीसारख्या अतिरिक्त सुविधा आहेत. प्रत्येक लोकोमोटिव्हमध्ये एकच कॅब असते. दोन युनिट्स एकत्रितपणे जास्तीत जास्त परवानगी असलेल्या वेगाने १०० वॅगन ओढू शकतात. सुरळीत आणि चांगली मालवाहतूक हाताळणी सुनिश्चित करण्यासाठी ते डीपीडब्ल्यूसीएस (वितरित पॉवर वायरलेस कंट्रोल सिस्टम)ने सुसज्ज आहेत. मारहौरा प्लांटमध्ये ब्रॉडगेज, स्टँडर्ड गेज आणि केप गेज असे तीन प्रकारचे ट्रॅक आहेत. विविध आंतरराष्ट्रीय वैशिष्ट्यांसाठी लोकोमोटिव्हचे उत्पादन आणि चाचणीसाठी परिसरात हे ट्रॅक ठेवण्यात आले आहेत. लोकोमोटिव्ह कस्टमायझेशन करण्यापूर्वी गिनीच्या भूभागाचा, हवामानाचा आणि आवश्यकतांचा सखोल अभ्यास करण्यात आला. डिझाइन स्थानिक गरजा पूर्ण करते, याची खात्री करण्यासाठी अभियंत्यांनी या पश्चिम आफ्रिकन राष्ट्राला अनेक भेटी दिल्या. त्यात मानक गेज ट्रॅक आणि बदलणाऱ्या हवामान परिस्थितीसाठी योग्य त्या यंत्रणा आहेत. या प्रदेशाचे हवामान लक्षात घेता, आव्हानात्मक वातावरणाचा सामना करण्यास मदत करण्यासाठी लोकोमोटिव्ह कस्टमायझेशन करण्यात आले. बिहारमधील या कारखान्याने २८५ लोकांना थेट रोजगार दिला आहे, तर अप्रत्यक्षपणे १,२१५ रोजगार उपलब्ध झाला आहे. पश्चिम आफ्रिकन राष्ट्राने त्याच्या सर्वात मोठ्या लोहखनिज खाण प्रकल्पावर काम सुरू केल्यामुळे निर्यात करार झाला आहे. त्यामुळे मजबूत मालवाहतुकीची मागणी निर्माण झाली आहे. गिनी प्रजासत्ताकाने रेल्वे कर्मचाऱ्यांच्या सोयीसाठी रेफ्रिजरेटर आणि मायक्रोवेव्ह ओव्हनसह वातानुकूलित केबिनसह विशिष्ट सुविधांची विनंती केली होती. गिनीमध्ये हवामान परिस्थिती विचित्र असल्याने लोको पायलटसाठी रेफ्रिजरेटर आणि मायक्रोवेव्ह निवडल्याचे कंपनीच्या एका अधिकाऱ्याने सांगितले. हे लोकोमोटिव्ह पश्चिम आफ्रिकन देशाच्या विशिष्ट गरजा पूर्ण करण्यासाठी कस्टमाइज केले आहेत. या निर्यातीमुळे गिनीच्या सर्वात मोठ्या लोहखनिज प्रकल्पासाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्यास मदत होईल आणि भारत-आफ्रिका आर्थिक संबंध मजबूत होतील. भारतात रेल्वे लोकोमोटिव्हचे उत्पादन १,६८१ युनिट्सपर्यंत वाढले आहे. ते अमेरिका, युरोप, दक्षिण अमेरिका, आफ्रिका आणि ऑस्ट्रेलियासारख्या देशांच्या एकूण लोकोमोटिव्ह उत्पादनापेक्षा जास्त आहे. निर्यातीमुळे रेल्वेच्या एकूण महसुलात मोठी वाढ होईल. भारतीय रेल्वेकडे एकूण चार लोको उत्पादन युनिट्स आहेत. त्यात वाराणसी येथील डिझेल लोकोमोटिव्ह वर्क्स, चित्तरंजन येथील चित्तरंजन लोकोमोटिव्ह वर्क्स, पटियाला येथील डिझेल मॉडर्नायझेशन वर्क्स आणि डंकुनी येथील इलेक्ट्रिक लोको असेंब्ली आणि ॲन्सिलरी युनिट यांचा समावेश होतो. डीएलडब्ल्यू आणि डीएमडब्ल्यू हे डिझेल लोको उत्पादन युनिट्स होते. तथापि त्यांनी अनुक्रमे २०१६-१७ आणि

२०१८-१९ पासून इलेक्ट्रिक लोकोमोटिव्हचे उत्पादन सुरू केले. भारतात बिहारप्रमाणेच गुजरातमध्ये रेल्वे इंजिन तयार करणारा कारखाना आहे; परंतु तिथे डिझेल इंजिने बनत नाहीत, तर विजेवर चालणारी इंजिने तयार केली जातात. भारत गुजरातमधील नव्याने बांधलेल्या दाहोद इंजिन कारखान्यात उत्पादित केलेल्या सर्वात शक्तिशाली इलेक्ट्रिक लोकोमोटिव्ह इंजिनपैकी एक युरोपियन देशांना आणि आफ्रिकन राष्ट्रांना निर्यात करण्यास सज्ज आहे.

पंतप्रधानांनी दाहोद येथील प्रकल्प राष्ट्राला समर्पित केल्यानंतर लगेच या कारखान्यातून रेल्वे इंजिनांची निर्यात सुरू झाली आहे. स्वदेशी इलेक्ट्रिक लोकोमोटिव्ह आता जगातील अनेक देशांमध्ये धावणार आहे. दाहोद प्लांट देशांतर्गत वापरासाठी आणि निर्यातीसाठी नऊ हजार अश्वशक्ती क्षमतेचे इलेक्ट्रिक लोकोमोटिव्ह तयार करणार आहे. हे लोकोमोटिव्ह भारतीय रेल्वेची मालवाहतूक क्षमता लक्षणीयरीत्या वाढवतील. त्यामध्ये नव्या श्रेणीतल्या ब्रेकिंग सिस्टीम असतील. त्या ऊर्जा वापर कमी करण्यासाठी डिझाइन केल्या आहेत. पंतप्रधान मोदी यांनी एप्रिल २०२२ मध्ये दाहोद प्लांटची पायाभरणी केली होती. तीन वर्षांपेक्षा कमी कालावधीमध्ये रेल्वेने दाहोदमधील रोलिंग स्टॉक वर्कशॉपमध्ये लोको मॅन्युफॅक्चरिंग शॉप यशस्वीरीत्या बांधले असून उत्पादन सुरू केले आहे. 'मेक इन इंडिया' आणि 'मेक फॉर द वर्ल्ड' उपक्रमांना पाठिंबा देण्यासाठी येथे ब्रॉड-गेज आणि स्टँडर्ड-गेज इलेक्ट्रिक लोकोमोटिव्ह तयार केले जात आहेत. हरित ऊर्जेचा वापर करून लोकोमोटिव्हची निर्मिती केली जात आहे. ते सरकारच्या शाश्वततेसाठीच्या वचनबद्धतेला बळकटी देते. 'मेड-इन-इंडिया' लोकोमोटिव्ह ४,५०० ते ५,००० टनांपर्यंतचे भार वाहून नेण्यास सक्षम आहे. अगदी तीव्र चढ-उतारांवरही हा भार वाहून नेण्याची त्याची क्षमता आहे. अत्याधुनिक 'आयजीबीटी प्रोपल्शन' तंत्रज्ञानाने सुसज्ज असलेले हे लोकोमोटिव्ह वाढीव ऊर्जा कार्यक्षमता आणि उच्च कार्यक्षमता देतात. ते रेल्वेच्या आधुनिकीकरण आणि स्वावलंबतेला हातभार लावत आहेत.

**– प्रा. सुखदेव बखळे**

(लेखक अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक आहेत.)

# कलाल-कलार समाजाचे भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळाचे घोडे कुठे अडले!

**राज्यात** काही समाजांनी कोणताही संघर्ष न करता त्यांना तडकाफडकी आर्थिक विकास महामंडळ प्राप्त झाले यांचेही आम्ही स्वागत करतो. कारणं यामुळे समाजाचा विकास होईल मग तो कोणताही समाज असो.परंतु गेल्या चार वर्षांपासून महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटना आर्थिक विकास महामंडळासाठी संघर्ष करीत आहे व शासन दरबारी मागणी करीत आहे परंतु सरकार यावर दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येते.कलाल-कलार समाजाला भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळ मिळावे यासाठी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथराव शिंदे,अतुलजी सावे यांना लेखी निवेदन सुध्दा देण्यात आले. सोबतच इतरही मंत्र्यांना निवेदन देण्यात आले आणि याबद्दल चर्चा सुध्दा झाली व त्यांनी ठोस आश्वासन सुध्दा दिले तुमच्या समाजाचा हा महत्त्वाचा प्रश्न आहे त्यामुळे कलाल-कलार समाजासाठी भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यात येईल.परंतु सरकार तर्फे आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यासाठी कोणत्याही प्रकारची अधिकृत कारवाई किंवा हालचाली अजून पर्यंत सरकार मार्फत करण्यात आलेली नाही याची खंत व दु:ख समाजाला आहे. समाजाने मंत्री महोदयांना समक्ष निवेदन दिलेच सोबतच मेल व्दारे अनेक पत्र व्यवहार सुध्दा केले परंतु कलाल-कलार समाजाच्या हाती निराशा आली.एककीकडे सरकार कलाल-कलार समाजाला आर्थिक विकास महामंडळापासुन डावलत आहे तर दुसरीकडे सरकारने जाहीर केलेल्या समाजाचे आर्थिक विकास महामंडळ समाजाच्या विकासासाठी कार्य करीत आहे.याची आम्हाला खंत वाटते. कोणताही समाज असो प्रत्येक समाजाचा विकास व्हायलाच पाहिजे.यासाठी महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटना नेहमीच स्वागतच करीत आली आहे.

सरकारने ब्राह्मण समाजासाठी परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन केले याचे स्वागतच.या महामंडळाचे अध्यक्ष आशिषजी दामले महामंडळाच्या माध्यमातून समाजासाठी काय-काय करता येईल यावर गांभीर्याने विचार करून समाजाच्या प्रती विकासाची गती वाढविण्याचे काम करीत आहेत.

दिनांक २२ जून २०२५ ला कराड येथे अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या सभेत त्यांनी प्रत्येक जिल्ह्यात परशुराम भवन उभारण्याची घोषणा केली सोबतच पारंपरिक व्यवसाय (पौरोहित्य )करणाऱ्यांना संधी देण्याकरिता पुढील पाऊल उचलण्याचे त्यांनी जाहिर केले. दामलेंच्या कार्याचे आम्ही स्वागत करतो कारण ते समाजाला पुढे नेण्याचे कार्य करीत आहेत.हीच संधी महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटनेला सरकार का देत नाही? आम्हालाही वाटते की प्रत्येक जिल्ह्यात भगवान सहस्त्रार्जुन भवन बनवावे व याचा फायदा समाजातील तळागाळातील गरीब समाज बांधवांना व्हावा.परंतु कलाल-कलार समाजाच्या प्रती सरकारचे घोडे कुठे अडले अजुन पर्यंत समजले नाही! आर्थिक विकास महामंडळाच्या बाबतीत पहिला हक्कदार कलाल-कलार समाज होता.परंतु सरकारने आर्थिक विकास महामंडळापासुन डावलल्याने समाज विकासापासुन दुरावल्या जात आहे.आज कलाल-कलार समाज अत्यंत मागासलेला आहे. कारण पारंपारीक व्यवसायांचा विचार केला तर फक्त १ टक्का पारंपरिक (मद्य) व्यवसाय आमच्या समाजाजवळ आहे व ९९ टक्के व्यवसाय पुंजीपती लोकांजवळ आहे त्यामुळे समाज पारंपरिक व्यवसायापासुन आजही कोसो दूर आहे. परंतु आज ९९ टक्के समाज बांधवांचे काय होईल याचा विचार सरकारने केला पाहिजे.

समाजाच्या व्यथा आम्ही मंत्रीमहोदयांना समक्ष सांगितल्या सोबतच अनेक निवेदने सुध्दा दिलेत परंतु सरकार कलाल-कलार समाजाच्या प्रती उदासीन असल्याचे दिसून येते यामुळे समाज बांधवांच्या भावना दुखावल्या जात आहे. आताही वेळ गेलेली नाही सरकारने कलाल-कलार समाजाच्या व्यथा समजून घ्याव्यात व इतर समाजाप्रमाणे कलाल-कलार समाजासाठी भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळ स्थापन करून समाजाला विकासाच्या प्रवाहात आणावे अशी मागणी महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटनेच्या वतीने माननीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना करण्यात येत आहे.

माननीय देवेन्द्रजी फडणवीस अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेत आहेत यामध्ये मुख्यत्वेकरून आणिबाणीच्या काळातील बंदिवानांची पेंशन दुप्पट करण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे याचे स्वागतच याच धर्तीवर कलाल-कलार समाजाच्या विकासाच्या दृष्टिकोनातून आपण एक पाऊल पुढे टाकुन कलाल-कलार समाजासाठी भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळ स्थापन करून समाजाचा विकासाचा मार्ग मोकळा करावा अशी आग्रहाची विनंती संघटनेच्या वतीने सरकारला करण्यात येत आहे.

**– रमेश लांजेवार ( प्रदेश प्रवक्ता )**

(महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटना)

मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# ...तर, मराठी भाषा २१५० अखेर नामशेष होईल!
## मराठी भाषा : अस्तित्वाचा संघर्ष आणि गरज

**महाराष्ट्र** ही संतांची, साहित्यिकांची आणि बहुभाषिक समृध्दतेची भूमी. छत्रपती शिवाजी महाराजांपासून ते पु. ल. देशपांडे यांच्यापर्यंत अनेक दिग्गजांनी मराठी भाषेचा अभिमान जपला, पण आजच्या महाराष्ट्रात भाषेचा विषय अभिमानापेक्षा राजकारणाचा आणि दिखाऊ घोषणांचा भाग बनला आहे. मागील काही वर्षांत शासनाकडून मराठी भाषा वाचवण्यासाठी अनेक शासकीय निर्णय (जीआर) घेतले गेले – दुकाने आणि आस्थापनांवर मराठी फलक बंधनकारक करणे, सरकारी कार्यालयात मराठीचा वापर सक्तीचा करणे, शालेय आणि व्यावसायिक शिक्षणात मराठीला स्थान देण्याचे आदेश देणे, स्पर्धा परीक्षा मराठीतून उपलब्ध करून देणे – हे सगळे उपाय चांगले वाटतात. पण यामागे एक मोठा प्रश्न आहे – या निर्णयांची अंमलबजावणी कितपत प्रामाणिक आहे?

मुंबई महापालिकेच्या २०२३ च्या पाहणीत स्पष्ट झाले की मुंबईतील केवळ ४७% दुकाने योग्य मराठी फलक लावतात. राज्यभरातील सुमारे ८५% शासकीय कागदपत्रे अजूनही इंग्रजीत तयार होतात. कोर्टांमध्ये ९५% सुनावण्या इंग्रजीत होतात आणि नागरिकांना मराठीत न्याय मिळवणे अजून कठीण आहे. शिक्षणाच्या बाबतीतही परिस्थिती वेगळी नाही. व्यावसायिक अभ्यासक्रम मराठीत सुरू करण्याची घोषणा झाली असली तरी ७०% विद्यार्थ्यांना मराठीतून दर्जेदार पुस्तके उपलब्ध नाहीत. स्पर्धा परीक्षांसाठी मराठीत पुरेशी सामग्री नसल्यामुळे मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांना अजूनही इंग्रजी पुस्तकांकडे धाव घ्यावी लागते.

या सगळ्याचा अर्थ असा की जीआर काढले जात आहेत, पण प्रत्यक्षात ते वरवरच्या स्तरावरच मर्यादित राहिले आहेत. मराठीचा वापर केवळ फलकांपुरता, सण-समारंभांपुरता आणि सरकारी कागदपत्रांच्या शीर्षकांपुरता राहतोय, पण शिक्षण, न्यायव्यवस्था, व्यवहार आणि दैनंदिन जीवनात अजूनही मराठी दुय्यम ठरत आहे. हे म्हणजे फक्त मराठीची बडिमुखी करायची आणि प्रत्यक्षात इंग्रजीला हात जोडायचे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार मातृभाषेत शिक्षण देण्यावर भर देण्यात आला आहे, पण महाराष्ट्रात त्याची अंमलबजावणी अर्धवट आहे. व्यावसायिक शिक्षणासाठी मराठी पुस्तके, तांत्रिक शब्दसंपदा आणि प्रशिक्षित शिक्षक उपलब्ध नाहीत. त्यामुळे शिक्षणाच्या माध्यमात मराठी टिकत नाही आणि विद्यार्थी इंग्रजीकडे वळतात. राजकीय पक्ष भाषेच्या नावावर आंदोलनं करतात, भाषिक अस्मितेचे नारे देतात, पण तेच नेते स्वतःच्या प्रचारासाठी इंग्रजी वापरतात, स्वतःच्या मुलांना इंग्रजी शाळेत घालतात आणि सरकारी कामकाज इंग्रजीतच चालवतात. भाषेचा उपयोग फक्त मतं मिळवण्यासाठी आणि प्रसंगी जनतेला भावनिक बनवण्यासाठीच होतोय का, हा गंभीर प्रश्न आता पडतो आहे.

जर आपण सध्याच्या परिस्थितीवर तातडीने उपाययोजना केली नाही, तर मराठी भाषेला भविष्यात मोठा धोका निर्माण होईल. यूनेस्कोच्या जागतिक भाषाविषयक अहवालानुसार, जर एखाद्या भाषेचा वापर नवीन पिढीमध्ये घटला, तर त्या भाषेला तीन ते चार पिढ्यांत म्हणजे सुमारे ७५ ते १०० वर्षांत अस्तित्व संकट येऊ शकते. जगात सध्या दर पंधरा दिवसांनी एक भाषा लुप्त होते. २१०० पर्यंत सुमारे ५०% भाषा नामशेष होतील, असा अंदाज जागतिक तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. सध्याचा मराठी भाषेचा वापर आणि त्यातील घसरणीचा वेग बघता, जर सध्याचं धोरण आणि निष्क्रियता अशीच चालू राहिली, तर मराठी भाषेला २१००-२१५० या काळात अस्तित्वाचा गंभीर धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

म्हणूनच मराठी भाषा वाचवण्यासाठी तातडीने काही ठोस आणि व्यवहार्य पावलं उचलणं अत्यावश्यक आहे. सर्वप्रथम शालेय शिक्षणात मातृभाषेला खऱ्या अर्थाने प्राधान्य दिलं पाहिजे. सर्व शाळांमध्ये, अगदी इंग्रजी माध्यमांमध्येही मराठी विषय सक्तीचा करावा आणि त्या शिकवण्याची गुणवत्ता वाढवावी. सर्व सरकारी व्यवहार, कागदपत्रे, आणि आदेश मराठीत असावेत आणि मराठीतूनच नागरिकांना सेवा दिली जावी. न्यायालयीन कामकाज जिल्हास्तरावर मराठीतच करणे बंधनकारक करावे, आणि न्यायालयीन निकाल, प्रपत्रे, अर्ज मराठीत उपलब्ध करून द्यावीत. व्यावसायिक आणि उच्च शिक्षण मराठीतून सहज आणि दर्जेदार पद्धतीने मिळाले पाहिजे. स्पर्धा परीक्षांसाठी मराठीतून दर्जेदार अभ्यास साहित्य सहज उपलब्ध करून दिले पाहिजे. आज डिजिटल युगात मराठी भाषेला जागा मिळवणे अत्यंत महत्त्वाचे आहे, म्हणून अधिकाधिक वेब पोर्टल्स, मोबाइल ॲप्स, ई-बुक्स, आणि तांत्रिक शब्दसंपदा मराठीत तयार करणे गरजेचे आहे.

मराठी भाषेला वाचवायचे असेल तर फक्त नियम करून भागणार नाही. मराठीचा वापर घराघरात, रस्त्यावर, व्यवहारात, शिक्षणात आणि डिजिटल माध्यमांमध्ये वाढवला पाहिजे. मुलांमध्ये मराठी वाचनाची आणि संभाषणाची सवय लावली पाहिजे. पालकांनी घरी मुलांशी मराठीत बोलायला सुरुवात केली पाहिजे. खाजगी क्षेत्रात – बँका, मॉल्स, हॉटेल्स, ग्राहक सेवा केंद्रे – मराठी व्यवहार बंधनकारक करायला हवे. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, मराठीचा अभिमान बाळगताना इतर भाषांचा द्वेष करायचा नाही. मराठी भाषा वाचवण्यासाठी भाषिक सहिष्णुता राखली पाहिजे.

जर आपण आजच प्रयत्न केले आणि या सर्व क्षेत्रांमध्ये योग्य दिशेने काम सुरू केले, तर मराठीला फक्त वाचवता येणार नाही, तर ती २१५० पर्यंत आधुनिक आणि जागतिक भाषांमध्ये सन्मानाने वावरू शकेल. पण जर आपण निष्क्रिय राहिलो, तर पुढच्या ७५ ते १०० वर्षांत मराठीचा वापर व्यवहारातून आणि कुटुंबातून संपण्याची शक्यता आहे. फक्त सण-समारंभ, जुनी गाणी आणि आठवणीतच मराठी उरण्याचा धोका आहे.

आज महाराष्ट्राला फक्त मराठी भाषा दिवस साजरा करून समाधान मानणाऱ्या लोकांची गरज नाही. महाराष्ट्राला हवी आहे अशी पिढी, जी मराठी मनापासून वापरेल, तिला आपले जीवनभाषा मानेल आणि इतर भाषांचा आदर राखत मराठीचा खरा अभिमान बाळगेल.

पु. ल. देशपांडे यांच्या अमर वाक्याने आपल्याला हेच सांगायचे आहे –

'जी व्यक्ती आपल्या भाषेवर प्रेम करते, ती इतर कुणाच्याही भाषेचा द्वेष करू शकत नाही.'

मराठी ही केवळ भाषा नाही, ती आपली संस्कृती आहे, आपली ओळख आहे. ती वाचवायची की हरवायची, हे आपण ठरवायचं.

**– डॉ. भारत कऱ्हाड,**

प्राचार्य, वराडकर महाविद्यालय

दापोली, जिल्हा रत्नागिरी.

# देशाच्या स्वातंत्र्यासाठी 'आझाद हिंद सेने'ची देशसेवा

**आझाद** हिंद सेना म्हणताच डोळ्यापुढे उभे राहतात ते देशाच्या स्वातंत्र्यासाठी जगाला गवसणी घालणारे नेताजी सुभाषचंद्र बोस ! आझाद हिंद सेना ही भारतीय पारतंत्र्याच्या काळात भारताची सेना होती. आझाद हिंद सेनेची स्थापना सुभाषचंद्र बोस यांनी दुर्सया महायुद्धाच्या काळात ५ जुलै १९४३ या दिवशी केली. ब्रिटिशांविरुद्ध लढा देण्यासाठी नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी ४० सहस्र भारतीय स्त्री-पुरुषांच्या सहभागाने ही सेना स्थापन केली आणि 'तुम मुझे खून दो, मैं तुम्हे आजादी दूंगा' असे आवाहन केले. आझाद हिंद सेनेच्या स्थापनादिनाच्या निमित्ताने हा लेखप्रपंच

आपल्या देशाबाहेर पडून साडे तीन वर्षे उलटून गेलेल्या नेताजींना आपल्या मातृभूमीत परतायची अनिवार ओढ होती, पण त्यांना देशात प्रवेश करायचा होता तो शत्रूचा नि:पात करून व आपल्या मातृभूमीला दास्यमुक्त करून आपल्या सार्वभौम देशाचा एक सन्माननीय नागरिक म्हणून. गेली साडेतीन वर्षे केलेली अपार मेहनत व नियोजन आता फलस्वरुप होण्याची लक्षणे दिसू लागत होती, मात्र नेताजी म्हणजे दिवास्वप्न पाहणारा आशावादी मनुष्य नव्हता तर तो एक दृष्टा होता. संपूर्ण तयारीनिशी व ताकदीनिशी हल्ला चढवुन तो निर्णायक व यशस्वी होण्याची पूर्ण खात्री झाल्यावर मगच ते आपला निर्णायक घाव घालणार होते. आणि असा निर्णायक हल्ला यशस्वी होण्यासाठी केवळ सैन्य व शस्त्रे पुरेशी नसून आपल्या देशातील बांधवांचा आपल्या प्रयत्नाला मनापासून पाठिंबा असणे आवश्यक आहे हे त्यांनी ओळखले होते. किंबहुना जेव्हा आझाद हिंद सेना पूर्वे कडून परकिय सत्तेवर बाहेरून हल्ला चढवेल त्याच वेळी जागृत झालेली व स्वतंत्र्यासाठी सज्ज झालेली सर्वसामान्य भारतीय जनता आतून उठाव करेल व या दुहेरी पात्यांत परकियांचा निभाव लागणार नाही आणि नेमका तोच स्वातंत्र्याचा क्षण असेल हा नेताजींचा ध्येयवाद होता.

मात्र यासाठी आपल्या देशवासियांना आझाद हिंद सेना ही आपली मुक्तिसेना व स्वतंत्र हिंदुस्थानचे भावी सेनादल आहे अशी भावना होणे अत्यावश्यक आहे असे नेताजींना वाटत होते.

हे अत्यंत कठिण होते हेही त्यांना माहित होते.याचे कारण एकिकडे धूर्त इंग्रजांनी चालविलेला अपप्रचार आणि खोडसाळपणे आझाद हिंद सेनेचा उल्लेख अत्यंत तुच्छतापूर्वक 'जिफ्स' (जॅपनिज इन्स्पायर्ड फिफ्थ कॉलम्नीस्ट्स) असा करीत असत.त्यामुळे आझाद हिंद सेना हे जपान्यांचे हस्तक दल असुन ते जपानरूपी शत्रूला भारतावर आक्रमण करण्यास मदत करीत आहेत व त्यातुन त्यांना सत्तेची लालसा आहे असे वाटू लागेल, अर्थातच ही सेना नसून ते घरभेदी आहे असे मत तयार होईल.दुसरीकडे प्रस्थापित नेत्यांनी व काँग्रेस पक्षानेही नेताजी व आझाद हिंद सेना यांना आपले म्हणण्यास नकार दिला होता व त्यांचा धिक्कारही केला होता.

प्रत्यक्ष आपल्या मातृभूमीत ही परिस्थिती तर जगात आपल्या सेनेचे काय स्थान असेल ? काय प्रतिमा असेल ? आपल्या देशाच्या स्वातंत्र्यसंग्रामास जागतिक पाठिंबा मिळिवणे अत्यंत महत्त्वाचे आहे हे नेताजींनी अभ्यासले होते. इतकेच नव्हे तर आपण व आपले सेनादल हे आपल्या देशाचे प्रतिनिधित्व करीत असून या प्रयत्नात सर्व स्वातंत्र्यवादी अशियाई राष्ट्रे तसेच पाश्चिमात्य राष्ट्रे यांनी एक स्वातंत्र्योन्मुख राष्ट्र म्हणुन आपल्या मागे उभे राहिले पाहिजे ही नेताजींची महत्त्वाकांक्षा होती. एखाद्या व्यक्तिला वा संघटनेला पाठिंबा देणे वा व्यक्तिश: मदत करणे आणि युद्धात एखाद्या राष्ट्राने न्याय्य वाटणाऱ्या राष्ट्राची बाजु घेणे यांत जमीन – अस्मानाचा फरक होता. मुळात जेव्हा एखाद्या देशाचे सैन्य स्वत:चा संग्राम उभा करते आणि समविचारी राष्ट्रे त्याला पाठिंबा देतात तेव्हा ते संकेताला अनुसरुन असते.

आझाद हिंद सेना म्हणजे कुणी व्यक्तिगत लाभासाठी वा आपल्या ऐक्यासाठी उभारलेली मोहिम नव्हती तर ती एका संग्रामस्थ राष्ट्राची अस्मिता होती. आणि म्हणूनच तिला वा तिच्या पाठीराख्या मित्रराष्ट्रांना नेताजी बदनाम होऊ देणार नव्हते, तर ते आपला संग्राम युद्धनितीला व संकेताला अनुसरून आपला व आपल्या राष्ट्राचा हक्क मिळिवण्यासाठी न्याय्य मार्गाने लढणार होते. ज्या कारणास्तव शिवरायांनी राजमुकुटाची यत्किंचितही आसक्ती नसताना रायगडावर स्वत:ला राज्याभिषेक करवून घेतला आणि स्वराज्य स्थापनेची घोषणा केली, नेमक्या त्याच उद्देशाने नेताजींना आझाद हिंद चे हंगामी सरकार स्थापण्याचा निर्णय घेतला. इथे पुन्हा एकदा नेताजींवरील शिवचरित्राचा प्रभाव दिसुन येतो. आपले लष्कर म्हणजे कुणा लुटारूंची टोळी नव्हे, कुणा सत्ताबुभुक्षिताची फौज नव्हे, कुणी अत्याचारी जमाव नव्हे तर हिंदुस्थान स्वतंत्र करण्यासाठी वचनबद्ध आणि ध्येयासक्त असलेले देशभक्त संघटित होऊन व स्वत:च्या भावी स्वतंत्र राष्ट्राचे प्रातिनिधीक असे सरकार स्थापून साऱ्या जगाला ग्वाही देणार होते की आम्ही आमच्या राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी आमच्या राष्ट्रध्वजाखाली आमच्या सेनानीच्या अधिपत्याखाली उपलब्ध त्या सर्व मार्गांनी आणि सहकार्यानी लढणार आहोत आणि हा संघर्ष आता स्वातंत्र्यप्राप्तीतच विलिन होईल.

मार्च १९४५ पासून मित्रराष्ट्रांपुढे जपानची पीछेहाट होऊ लागली. ७ मे १९४५ ला जर्मनीने विनाअट शरणांगती पत्करली तर जपानने १५ ऑगस्ट या दिवशी शरणागतीची अधिकृत घोषणा केली. जपान-जर्मनीच्या या अनपेक्षित पराभवाने सुभाषचंद्रांच्या सर्व आशा मावळल्या. पुढील रणक्षेत्रासाठी सयामला जात असतांनाच १८ ऑगस्ट १९४५ रोजी फार्मोसा बेटावर त्यांचे बॉम्बर विमान कोसळून त्यांचा हदयद्रावक अंत झाला. आझाद हिंद सेनेच्या फौजा दिल्लीपर्यंत पोहोचू शकल्या नाहीत, तरी त्या सेनेने जे प्रचंड आव्हान ब्रिटीश साम्राज्यशाहीसमोर उभे केले, त्याला इतिहासात तोड नाही. त्यामुळे ब्रिटीश सत्ता हादरली. भारतावर पुढे सत्ता गाजवणे कठीण जाईल, याची कल्पना इंग्रजांना आली.

चाणाक्ष आणि धूर्त इंग्रज सरकारने भावी संकट ओळखल. पुढील मानहानी पत्करण्यापेक्षा हा देश सोडून जाण्याचा निर्णय इंग्रजांनी घेतला, अशी कबुली तत्कालीन ब्रिटीश पंतप्रधानांनी दिली होती. आझाद हिंद सेनेच्या सैनिकांच्या निस्वार्थ देशसेवेमुळे स्वातंत्र्यकांक्षा कोट्यवधी देशवासियांच्या मनात निर्माण झाली.नेताजींचे असीम साहस आणि तन, मन, धन यांचा त्याग केलेल्या आझाद हिंद सेनेच्या सैनिकांना विनम्र अभिवादन !

संकलक : कु. प्रियांका लोणे, मराठवाडा संघटक, हिंदु जनजागृती समिती, संपर्क क्र.: ८२०८४४३४०१

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक

लोकविजय

(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)

हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरुणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतननागर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.

: संपादक :

राजेंद्र पांडुरंग रांजणीकर

मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५

e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.

(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# माजी मंत्री अशोकराव पाटील डोणगांवकर यांचे निधन



गंगापूर दि.५ (प्रतिनिधी)- माजी मंत्री अशोकराव राजाराम पाटील डोणगांवकर यांचे छत्रपती संभाजीनगर येथे प्रदीर्घ आजाराने आज (दि.५) सकाळी ११.५७ वाजता निधन झाले. त्यांच्यावर रविवारी (दि.६) सकाळी ११.०० वाजता मुळगांव डोणगाव, (ता. गंगापूर) येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

त्यांच्या प्रश्चात पत्नी कुसुमताई, भाऊ जिल्हा मजुर फेडरेशनचे चेअरमन रमेश पाटील डोणगांवकर, मुलगा जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष किरण पाटील डोणगांवकर, मुलगी आमदार मोनिका राजीव राजळे, मुलगा राहुल डोणगांवकर, मुलगी- वैशालीताई सावंत व नातवंडे असा परिवार आहे.

अशोक पाटील डोणगांवकर यांचा जन्म ११ नोव्हेंबर १९४३ रोजी झाला. त्यांचे शालेय व महाविद्यालयीन शिक्षण छत्रपती संभाजीनगर येथील सरस्वती भुवन शिक्षण संस्थेत झाले. सन १९७७ मध्ये त्यांनी डोणगांव ग्रामपंचायत निवडणुकीत त्यांच्या पॅनेलने विजय मिळवला . सन १९७७ ते १९८० या कालावधीत सरपंच पद भुषविले. त्याच दरम्यान ते वाळूज जिल्हा परिषद सर्कल मधून सदस्य म्हणून निवडून आले. जिल्हा परिषद सदस्य असतानाच सन १९८० मध्ये तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांची विमानतळावर भेट घेऊन गंगापूर-खुलताबाद मतदार संघाचे काँग्रेसची उमेदवारी मिळवून ते आमदार म्हणून निवडून आले. सन १९८० ते १९८५ या त्यांच्या आमदारकीच्या कार्यकाळात त्यांनी गंगापूर-खुलताबाद तालुक्यात विविध विकास कामे त्यामध्ये एस.टी.डेपो, आय.टी.आय., तहसिल इमारतीसह तालुक्याला जोडणारे प्रमुख रस्त्यांसह विविध कामांसाठी विकास निधी खेचून आणून ते मार्गी लावले.

दरम्यान सन १९८३ ते १९८६ या कार्यकाळात त्यांनी मोपेक चे उपाध्यक्ष पदही भुषविले. भुविकास बँकेचे संचालक म्हणुनही त्यांनी काम पाहिले. सन १९९५ मध्ये अतिशय प्रतिकुल प्ररिस्थितीत त्यांनी अपक्ष म्हणुन निवडुन येऊन तत्कालीन भाजपा सेनेच्या युतीला सरकार स्थापन करणेसाठी कमी पडत असलेली आमदारांची संख्या जुळवण्यासाठी महाराष्ट्रातील अपक्ष म्हणुन निवडुन आलेले आमदारांची मोट बांधुन त्यांचे नेतृत्व करीत युती सरकार बनविण्यात महत्वाची भुमिका बजावली. या युतीच्या मंत्रीमंडळात त्यांना सार्वजनिक बांधकाममंत्री म्हणुन मंत्रीपदाची संधी मिळाली. या मंत्रीपदाच्या कार्यकाळात त्यांनी गंगापुर -खुलताबाद तालुक्याच्या विकासासाठी नांदुर-मधमेश्वर कालव्यासाठी मोठा निधी उपलब्ध करुन हा कालवा चालू केला. तसेच गंगापूर ते भेंडाळा रस्ता, नागपूर मुंबई महामार्ग, घृष्णेश्वर सहकारी साखर कारखाना व इतर मोठी कामे मार्गी लावले. गंगापूर व खुलताबाद तालुक्यात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची शिक्षणाची गैरसोय दुर होण्यासाठी अशोक पाटील डोणगांवकर यांनी सन १९८२ साली मुक्तेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना करून सन १९८३ साली लासुर स्टेशन येथे मुलींसाठी पहिल्या कन्या विद्याल्याची सुरुवात केली. आज घडीला संस्थेच्या दहा पेक्षा जास्त शाळा व कनिष्ठ महाविद्यालये दोन्ही तालुक्यात कार्यरत आहेत.

## मनपा प्रियदर्शिनी विद्यालयात उत्स्फूर्त दिंडीचे आयोजन, अवघे वातावरण झाले भक्तिमय



छत्रपती संभाजीनगर दि.५ (प्रतिनिधी)- महानगरपालिका छत्रपती संभाजी नगर केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय प्रियदर्शनी मयूरबन कॉलनी या विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आज आषाढी एकादशीच्या निमित्ताने विठ्ठल रुक्माई व वारकऱ्यांच्या वेशभूषेमध्ये दिंडी काढली.ही दिंडी शाळेपासून शंभू नगर भागात काढण्यात आली.याप्रसंगी रस्त्यात लागणाऱ्या सर्व मंदिरांना त्यांनी भेटी दिल्या व देवाचे दर्शन घेतले. याप्रसंगी उपस्थित पालकांनी व शिक्षकांनी दिंडीमध्ये फुगड्या खेळल्या. याप्रसंगी पालकांनी देखील उत्स्फूर्त सहभाग घेऊन मुलांचे फोटो काढले, व्हिडिओ शूटिंग केले. परिसरातील नागरिकांनी येऊन या विठोबा रुक्माई चे दर्शन घेतले.

मोठ्या उत्साहाच्या वातावरणामध्ये पाऊस सुरू असताना देखील दिंडी सुरू होती. या दिंडीच्या नियोजनासाठी मुख्याध्यापक संजीव सोनार यांच्या मार्गदर्शनाखाली तेजस्विनी देसले, रश्मी होनमुटे, पूजा सोनवणे, मीरा मोरे, यांनी परिश्रम घेतले.

# छत्रपती संभाजीनगरात पोलिसांची कुंटनखान्यावर धाड

छत्रपती संभाजीनगर दि.५ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलिसांच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक पथकाने झाल्टा, बिड बायपास येथील हॉटेल अंबिका लॉजिंग अँड बोर्डिंगवर ४ जुलै २०२५ रोजी छापा टाकून अवैध देहविक्री रॅकेटचा पर्दाफाश केला. या कारवाईत ४ पीडित महिलांची सुटका करण्यात आली असून, हॉटेल मालक आणि मॅनेजरवर गुन्हा दाखल झाला आहे.

पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारावर, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी पूजा नागरे आणि सहायक पोलीस निरीक्षक सरला गाडेकर यांच्या पथकाने हॉटेलवर सापळा रचला. पथकाने एका डमी ग्राहकाला हॉटेलमध्ये पाठवले. हॉटेल मॅनेजर सुभाष फकिरा राठोड (वय ४९, रा. अमराई, छ. संभाजीनगर) याने डमी ग्राहकाकडून १,००० रुपये घेऊन त्याला खोली क्रमांक १०६ मध्ये पाठवले आणि तिथे एका महिलेला पाठवण्याचे कबूल केले. यावरून पथकाने छापा टाकला आणि त्या महिलेची सुटका केली. तसेच, हॉटेलच्या इतर खोल्यांमधून आणखी ३ पीडित महिलांना सोडवण्यात आले. पोलिसांच्या तपासात असे समोर आले की, हॉटेल मालक विश्वास शिंदे (वय ५१, रा. झाल्टा, छ. संभाजीनगर) आणि मॅनेजर सुभाष राठोड हे गरीब आणि अशिक्षित महिलांचा आर्थिक परिस्थितीचा गैरफायदा घेऊन त्यांच्याकडून जबरदस्तीने देहविक्री करवत होते. पोलिसांनी दोन्ही आरोपींविरुद्ध अनैतिक देह व्यापार प्रतिबंधक कायद्यांतर्गत (कलम ३, ४, ५) चिकलठाणा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. तसेच, ५७,९९० रुपयांचा मुद्देमाल, मोबाइल फोन आणि इतर साहित्य जप्त करण्यात आले. ही कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, अपर पोलीस अधीक्षक अन्नपूर्णा सिंह, उपविभागीय पोलीस अधिकारी पूजा नागरे, सहायक पोलीस निरीक्षक सरला गाडेकर, पोलीस उपनिरीक्षक स्वप्निल नरवडे, विनोद भालेराव आणि पोलीस कर्मचारी दिलीप साळवे, कपिल बनकर, ईशाद पठाण, सपना चरवंडे, भाग्यश्री चव्हाण, संदीप थोरात यांनी यशस्वीपणे पार पाडली.

पोलिसांनी या कारवाईद्वारे अवैध देहविक्री रॅकेटवर मोठा प्रहार केला असून, पीडित महिलांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे. छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलिसांच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक पथकाने झाल्टा, बिड बायपास येथील हॉटेल अंबिका लॉजिंग अँड बोर्डिंगवर ४ जुलै २०२५ रोजी छापा टाकून अवैध देहविक्री रॅकेटचा पर्दाफाश केला. या कारवाईत ४ पीडित महिलांची सुटका करण्यात आली असून, हॉटेल मालक आणि मॅनेजरवर गुन्हा दाखल झाला आहे.

पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारावर, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी पूजा नागरे आणि सहायक पोलीस निरीक्षक सरला गाडेकर यांच्या पथकाने हॉटेलवर सापळा रचला. पथकाने एका डमी ग्राहकाला हॉटेलमध्ये पाठवले. हॉटेल मॅनेजर सुभाष फकिरा राठोड (वय ४९, रा. अमराई, छ. संभाजीनगर) याने डमी ग्राहकाकडून १,००० रुपये घेऊन त्याला खोली क्रमांक १०६ मध्ये पाठवले आणि तिथे एका महिलेला पाठवण्याचे कबूल केले. यावरून पथकाने छापा टाकला आणि त्या महिलेची सुटका केली. तसेच, हॉटेलच्या इतर खोल्यांमधून आणखी ३ पीडित महिलांना सोडवण्यात आले. पोलिसांच्या तपासात असे समोर आले की, हॉटेल मालक विश्वास शिंदे (वय ५१, रा. झाल्टा, छ. संभाजीनगर) आणि मॅनेजर सुभाष राठोड हे गरीब आणि अशिक्षित महिलांचा आर्थिक परिस्थितीचा गैरफायदा घेऊन त्यांच्याकडून जबरदस्तीने देहविक्री करवत होते. पोलिसांनी दोन्ही आरोपींविरुद्ध अनैतिक देह व्यापार प्रतिबंधक कायद्यांतर्गत (कलम ३, ४, ५) चिकलठाणा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. तसेच, ५७,९९० रुपयांचा मुद्देमाल, मोबाइल फोन आणि इतर साहित्य जप्त करण्यात आले. ही कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, अपर पोलीस अधीक्षक अन्नपूर्णा सिंह, उपविभागीय पोलीस अधिकारी पूजा नागरे, सहायक पोलीस निरीक्षक सरला गाडेकर, पोलीस उपनिरीक्षक स्वप्निल नरवडे, विनोद भालेराव आणि पोलीस कर्मचारी दिलीप साळवे, कपिल बनकर, ईशाद पठाण, सपना चरवंडे, भाग्यश्री चव्हाण, संदीप थोरात यांनी यशस्वीपणे पार पाडली. पोलिसांनी या कारवाईद्वारे अवैध देहविक्री रॅकेटवर मोठा प्रहार केला असून, पीडित महिलांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

## गजर विठ्ठलाचा



भक्त विठ्ठलाचा साधा भोळा
त्यासी विठूनामाचा लळा
आषाढी कार्तिकीला
भरतो पंढरीला
वारकऱ्यांचा मेळा
विठ्ठलाच्या दर्शनाला
दिंड्या होती गोळा
विठू हा सावळा
तुळशीमाळ गळा
उभा विटेवरी
ठेवूनी कर कटेवरी
चित्त त्याचे भक्तांवर
चाले विठु नामाचा गजर
अपूर्व भक्तिचा हा सोहळा
पाहू सुखे याची डोळा
टाळ मृदुंगाच्या तालात
चालती पाऊले झोकात
नाम विठू माऊलीचे मुखात
भक्तिच्या नादात
अबिर गुलाल उधळीत
येती दिंड्या पंढरीत
स्नान पवित्र चंद्रभागेत
आनंद विठ्ठलाच्या नामात
अलोट भक्तांच्या सागरात
दर्शन कळसाचे घेत
वारकरी धन्य होत
फिरती माघारी परत
गजर विठू नामाचा करत
आस पुढच्या दर्शनाची ठेवत

**- डॉ.अलका काथार**

# "जय गुजरात"ची घोड चूक एकनाथ शिंदेना भोवणार !

राज उद्धव ठाकरे बंधू एकत्र येत असल्याचे पाहून अनेकांची भंबेरी उडाली आहे. मराठी अस्मितेवर घाला घालून हिंदी सक्तीची चूक भाजप सरकारला नक्कीच गोत्यात आणणार यात कोणाचेही दुमत होणार नाही. अर्थात भाजप व शिंदे सेनेचा अपवाद असेलच. महाराष्ट्रात परप्रांतीय लोकांचे मतदान वाढत असून ते निर्णायक ठरू शकते हे भाजप ने ओळखले आहे. मुख्यत: मुंबईमध्ये मराठी मतदार हे ठाकरेंचीच पाठराखण करतात हे लोकसभेच्या निवडणुकीतील शिव सेनेच्या विजयानंतर भाजपाने हेरले आहे. मुस्लिम व बहुजनांनी देखील पाठ फिरवल्याने हिंदी भाषिक तसेच अन्य परप्रांतीयांची मतं मिळवण्यासाठी महापालिक निवडणुकीच्या तोंडावर मराठी विरुद्ध हिंदी भाषिक असा वाद कपटी भाजपने पेटवून दिला व स्वतःची राजकीय पोळी भाजून घेण्यासाठी त्याचा वापर कसा करता येईल याची ते व्युहरचना करीत आहेत.

इकडे हिंदी सक्तीच्या मुद्यावरून राज व उद्धव ठाकरे हे तब्बल १६ वर्षानंतर एकत्र आल्याने मराठी मतं भाजपा विरोधात जाणार हे नक्कीच. त्यातून मनसे व उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने एकत्र निवडणूक लढविल्यास भाजपाला जो मत विभाजनाचा लाभ मिळणार होता,तो मिळणार नाही.

हिंदी भाषिकांत मनसे व शिवसेनेची मनं कलूषित करून भाजपचे मन भरले नाही. एकनाथ शिंदे यांना पुण्यातील कार्यक्रमात अमित शाह यांच्या उपस्थितीत "जय गुजरात" म्हणायला लावण्याची खेळी भाजपने खेळली. भाजपच्या स्क्रिप्ट मधील जय गुजरात ते बोलून गेले.उपमुख्यमंत्री महाराष्ट्राचा, कार्यक्रम महाराष्ट्रात असताना त्यांनी जय गुजरातने भाषण संपवावे हे सर्व अनाहुतपणे घडलेले नाही. एकनाथ शिंदे नेहमी प्रमाणे जय हिंद, जय महाराष्ट्र बोलून काही सेकण्ड थांबले व अरे जय गुजरात बोलायचे तर राहून गेले हे आठवताच,कसे बसे "जय गुजरात" बोलले. यावेळची एकनाथ शिंदेची देहबोली मिशन पूर्ण केल्यासारखी होती. तर अमित शाह मात्र जणू काही घडलेच नाही! या अविर्भावात व्यासपीठावर बसून होते. आपण पाळलेला प्राणी आपल्याशी किती प्रामाणिक आहे, हे अमित शाह यांना दिसून आले तर मी किती चांगली "बांग" दिली याचा अभिमान एकनाथ शिंदेनी शाहना दाखवून दिला व आपला खुंटा बळकट केला. त्याच वेळी अजित पवारांनी मात्र महाराष्ट्राची बूज राखली व अमित शाह समोरच जय हिंद व जय महाराष्ट्राचा नारा दिला. त्यांनी मिंद्यांचे अनुकरण केले नाही, हे विशेष.

एकनाथ शिंदेच्या कृतीचा भाजपाला अपेक्षित असलेला परिणाम लगेच दिसून आला.जय गुजरात वरून एकनाथ शिंदेवर टिकेची झोड उठली. त्यामुळे मराठी हिंदीच्या युद्धात गुजराती ने ऊडी घेतली. भाजपाला मनसे व शिवसेनेच्या विरोधात गुजराती जनमत तयार करण्याची आयती संधी मिळाली. कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ,म्हणतात तसे शिंदेच्या दांड्याने मराठी-गुजराती वाद पेटवण्याची संधी भाजपने साधली. यात एकनाथ शिंदे पुरते बदनाम झाले तरी "बदनाम हुये तो क्या हुवा,नाम तो हुवा" अशी एकनाथ शिंदेची अवस्था झाली. महाराष्ट्रात मराठी राज्याचा उपमुख्यमंत्री जय गुजरात बोलतो हे चित्र भाजपा साठी लाभदायक असले तरी बाळासाहेब व दिघेसाहेबांचा जप करीत आपल्या गद्दारीचे उदात्तीकरण करणाऱ्या एकनाथ शिंदेची गोची झाली. ते व त्यांची शिवसेना मराठी माणसांच्या मनातून उतरून गेली. अश्या प्रकारे भाजपने एकनाथ शिंदेचा गेम केला. एकनाथ शिंदेनी, शाहची मर्जी राखण्यासाठी केलेली ही घोडचूक त्यांना नक्कीच भोवणार!

**- दिलीप मालवणकर**
ज्येष्ठ पत्रकार
***

दैनिक लोकविजय CHANGE OF NAME

HAVE CHANGED MY NAME FROM
**OLD NAME** : KAZI MISBAH FATEMA AKHEEL
**NEW NAME** : MISBAH FATEMA AKHEEL KAZI
**ADDRESS** : PLOT NO.149/A, ARIF COLONY, NEAR AAMKHAS MAIDAN, AURANGABAD, 431001 MAHARASHTRA

(पान १ वरून)

## कोणत्याही वादापेक्षा महाराष्ट्र मोठा:...

आता चर्चा सुरू होतील की कोण कमी हसले, कोण कमी बोलले. आजचा हा मेळावा कुठलाही झेंडा न घेता मराठी ही अजेंडा समोर ठेवून घेण्यात आला आहे. महाराष्ट्राकडे कुणी वेडा वाकड्या नजरेने पाहायचे नाही. हिंदीचा प्रश्नच नव्हता अचानक कुठून हा विषय आला. लहान मुलांना हिंदी शिकावी ही जबरदस्ती तुम्ही करत आहात.कुणाला काहीच विचारायचे नाही शिक्षण तज्ञांचे मत विचारात घ्यायचे नाही. केवळ आमच्याकडे बहुमत आहे म्हणून आम्ही निर्णय लादणार.तुमच्या हातात सत्ता असेल ती विधान भवनात रस्त्यावर आमच्याकडे सत्ता आहे.

राज ठाकरे म्हणाले की, मी एक पत्र लिहले, दुसरे लिहले मग दादा भुसे माझ्याकडे आले.मला म्हणाले की आम्ही काय म्हणतो समजून घ्या. ऐकूण घ्या. म्हटले दादा तुम्हाला एक सांगतो तुम्ही काय सांगता ते ऐकूण घेईल पण ऐकणार नाही. त्रिभाषा सूत्र हे केवळ केंद्र सरकार आणि राज्य सरकारमधील दूवा म्हणून आणण्यात आले. आज सुप्रीम कोर्ट, हायकोर्टात इंग्रजी आहे तिथे हे सूत्र नाही. केंद्रीय शैक्षणिक धोरणातही हे सूत्र नाही.इतर कोणत्या राज्यात ही नाही. महाराष्ट्रात प्रयोग करुण पाहिला. दक्षिणेतील राज्य तर यांना विचारतही नाही. पण महाराष्ट्र पेटून उठला की काय होते हे सत्ताधाऱ्यांना दिसले असेल. त्याशिवाय का माघार घेतली.

राज ठाकरे म्हणाले की, मी त्या दिवशी दादा भुसेंना सांगितले उत्तरेकडील राज्य कोणती तिसरी भाषा आणणार आहेत. त्यांनी तिसरी भाषा आणली पाहिजे. हिंदी भाषीक राज्य हे आर्थिकदृष्या मागस आहेत.हिंदी न बोलणारी राज्य आर्थिक दृष्टीने प्रगत आहे, यावरही आम्ही हिंदी शिकायचे. यांना हिंदीतून राज्य सांभाळता आली नाही त्यांचा विकास करता आला नाही. हिंदी न बोलणाऱ्या राज्यात हिंदी बोलणाऱ्या राज्यातून लोक कामासाठी येत आहे. हिंदी कुणासाठी शिकायचे मुलं काय हिंदी चित्रपटसृष्टीमध्ये जाणार आहे का? हिंदी भाषेबद्दल मला कधीच वाईट वाटत नाही. भाषा कोणतीही श्रेष्ठच असते. एक लिपी उभी करण्यासाठी खूप ताकद लागते. भाषा अशीच उभी राहत नाही.

राज ठाकरे म्हणाले की, अमित शहा म्हणाले पुढे इंग्रजी येणारे म्हणतील की मला इंग्रजी येते हे सांगण्याची लाज वाटेल पण त्यांनाच इंग्रजी येत नाही. १२५ वर्षे मराठ्यांनी राज्य केले पण आम्ही कुणावर मराठी लादली का? २०० वर्षांपूर्वी हिंदी आली, शिवरायांच्या काळात हिंदी नव्हती. हिंदीचे काय करायचे आहे नेमके, यांनी फक्त मुंबई वेगळी करता येते का यासाठी भाषेला डिवचून बघू महाराष्ट्र शांत राहिला तर पुढे ते पाऊल टाकू. कुणाची माय व्यायली आहे त्याने महाराष्ट्राला, मुंबईला हात घालून दाखवावा. आम्ही शांत आहोत याचा अर्थ गांडू आहोत असा नाही. आता माघार घेतली तर प्रकरण वेगळ्या ठिकाणी वळवत ठाकरेंची मुले इंग्रजी माध्यमामध्ये शिकलीकडे वळवलं. दादा भुसे मराठी माध्यमामध्ये शिकले आणि राज्याचे शिक्षणमंत्री झाले.देवेंद्र फडणवीस इंग्रजी माध्यमामध्ये शिकून मुख्यमंत्री झाले. कुठे काय शिकले याचा काय संबंध. कोणाकोणाची मुलं परदेशात शिकताय याची यादी आहे आमच्याकडे. मंत्रिमंडळातील एकेकाची हिंदी ऐका फेफर येईल.

राज ठाकरे म्हणाले की, आम्ही मराठी माध्यमात शिकलो आणि आमची मुलं इंग्रजी माध्यमामध्ये शिकली. सन्माननीय बाळासाहेब ठाकरे, आणि माझे वडील हे इंग्रजी माध्यमामध्ये शिकले. या दोघांवर तुम्ही मराठीबद्दल शंका घेऊ शकतात का? लालकृष्ण अडवाणी हे मिशनरी शाळेत शिकले. हिंदुत्वावर शंका घेऊ का त्यांच्या? दक्षिण भारतात सर्व जण भाषेसाठी एकत्र येतात पण तिथे असले प्रश्न उपस्थित केले जात नाही. उद्या मी हिबरूमध्ये शिकेल आणि मराठीचा अभिमान बाळगेल. तुम्हाला काय समस्या आहे का?

राज ठाकरे म्हणाले की, तुम्ही कुठे शिकलात यावर तुमचा कडवटपणा नसतो तर तो आतमध्ये असावा लागतो. बाळासाहेब ठाकरे इंग्रजी शाळेत शिकले, इंग्रजी वृत्तपत्रासाठी काम करत होते पण मराठीचा अभिमानासाठी त्यांनी तडजोड केली नाही. सैन्यदलांमध्ये वेगवेगळ्या प्रांतामधील लोकं हेत ते शत्रू दिसला की तूटून पडतात त्यांना भाषेचा प्रश्न आला का? मग एक भाषा लोकांना बांधून ठेवते याचा काय अर्थ? या गोष्टीमागे काय राजकारण आहे? मराठी म्हणून आपण सर्वजण एकत्र आलो आहोत, लक्षात ठेवा हे आता जातीचे कार्ड खेळतील मराठी म्हणून एकत्र होऊ देणार नाही. काल मीरा-भाईदरमध्ये एकाला मारले तर गुजरात्याला मारले का? अजून तर काहीच केले नाही अर्थात त्यांना मराठी आली पाहिजेच, पण त्यासाठी ऊठसूट मारहाण करण्याची गरज नाही, पण जास्त नाटकं केली तरी कानाखाली आवाज काढलाच पाहिजे. पण चूक त्यांची पाहिजे. अश्या गोष्टीचे व्हिडीओ काढू नका. मारणारा सांगत नसतो मार खाणारा सांगत असतो मला मारले त्यांना सांगू द्या.उगाच कुणाला मारु नका.

राज ठाकरे म्हणाले की, १९९९ मध्ये शिवसेना- भाजपचे सरकार येणार नाही येणार अशी परिस्थिती होती. मी मातोश्रीवर खाली बसलो होतो तेव्हा प्रकाश जावडेकर आले ते म्हणाले बाळासाहेबांना भेटायचे आहे मी त्यांना सांगितले आता झोपायची वेळ आहे ते भेटणार नाही. तुम्ही विषय काय ते सांगा मी त्यांना निरोप देतो.

जावडेकर म्हणाले मुख्यमंत्रीपदाचा विषय झाला आहे, मी विचारले काय झाले तेव्हा जावडेकरांनी सांगितले की सुरेश जैन यांना मुख्यमंत्री करायचे ठरवले आहे हे बाळासाहेबांना सांगायचे आहे. मी काकांना आवाज दिला तेव्हा बाळासाहेबांना सुरेश जैन यांचे नाव घेऊन जावडेकर आल्याचे सांगताच बाळासाहेबांनी महाराष्ट्राचा मुख्यमंत्री मराठी होईल दुसरा कुणी होणार नाही. मला तेव्हाच कळाले मराठीसाठी सत्ता सोडली असे ते म्हणाले.

## आमच्या दोघांतील अंतरपाट...

लढलो आणि आपण घेतली. काश्मीरमध्ये ३७० कलम हटवायला आपण पाठिंबा दिला होता. ते म्हणाले होते, एक निशाण एक झेंडा. हिंदी सक्ती आम्ही लावून घेत नसतो. उद्धव ठाकरे यांनी निर्णय आणला म्हणतात. मी एवढं काम करत होतो तर सरकार कशाला पाडलं? महाराष्ट्रात मराठी सक्ती केल्यावर तो भेडिया बोलतोय. मराठी माणूस मुंबई बाहेर नेला, असं तुम्हाला वाटत असेल तर २०१४ नंतर मुंबईतील उद्योगधंदे गुजरातला कसे गेले? तुम्ही आमच्यात गद्दारी करवली आणि आमचं सरकार पाडलं. तुमचे मालक तिकडे गुजरातला बसले आहेत. दोन व्यापारी त्यांच्यासाठी तुम्ही हे करत आहात, अशी टीका त्यांनी यावेळी भाजपवर केली.

उद्धव ठाकरे यांनी आपल्या भाषणात एकनाथ शिंदे यांचे नाव न घेता म्हटले की, काल एक गद्दार जय गुजरात बोलला. अरे किती लाचारी करायची? पुष्पा पिक्चरमध्ये हिरो दाढीवरुन हात फिरवून म्हणतो, झुकेगा नय साला. पण आपले गद्दार म्हणतात, कुछ बी बोलो, उठेगा नही साला. हिंदी भाषेच्या सक्तीला विरोध न करणारा बाळासाहेबांच्या विचाराचा पाईक सू शकेल का? आपला मालक आला म्हणून त्याच्यासमोर जय गुजरात म्हणणारा बाळासाहेबांच्या विचाराचा पाईक असू शकेल का?, असा सवाल उद्धव ठाकरे यांनी विचारला. आपण आता डोळे उघडले नाहीत तर पुन्हा कधी आपले डोळे उघडण्याची वेळ येणार नाही. आता आलेली जाग जाणार असेल तर भविष्यात स्वत:ला मराठी आईची मुलं बोलू नका, असेही उद्धव ठाकरे यांनी म्हटले.

## एकाच्या भाषणात सत्तेची,....

राज्यगीत म्हटले, यासाठी त्यांचे अभिनंदन. पण महाराष्ट्राच्या राज्यगीताला मी मुख्यमंत्री असताना मान्यता दिली आणि ते राज्यगीत सुरू केले. मी मुख्यमंत्री असताना, देवेंद्र फडणवीस, अजित पवार आमच्या टीमने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा निर्णय घेतला. त्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी होकार देत तत्काळ मान्यता दिली. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देणाऱ्या मोदींनाही त्यांनी सोडले नाही. हे दुर्दैवी आहे. यातून त्यांची वृत्ती, त्यांची पोटदुखी दिसून आली. त्यांची लाचारी दिसून आली, असा टोला एकनाथ शिंदेंनी लगावला.

राज ठाकरे यांच्या भाषणात मराठी माणसासाठी असलेली तळमळ दिसली. तर उद्धव ठाकरे यांच्या भाषणात सत्ता आणि खुर्चीसाठीची मळमळ दिसली, अशी टीका शिंदे यांनी केली. उद्धव ठाकरे माझ्यावर सातत्याने टीका करत असतात. पण मी त्यांच्या टीकेला उत्तर देत नाही. मी कामातून उत्तर दिले. त्यामुळेच मी मुख्यमंत्री झालो. अडीच वर्षांनी झालेल्या निवडणुकीतही आमचा मोठा विजय झाला, असे एकनाथ शिंदे म्हणाले.

मराठी माणूस मुंबईच्या बाहेर का फेकला गेला? मराठी टक्का कमी का होत गेला? वसई, विरार, नालासोपारा, बदलापूर, अंबरनाथपर्यंत मराठी माणूस का गेला? याचे उत्तर उद्धव ठाकरेंनी द्यावे, असेही एकनाथ शिंदे म्हणाले.

ठाकरे बंधू एकत्र येण्याबाबत प्रश्न विचारल्यावर लोकशाहीमध्ये कोणालाही कोणासोबतही युती आणि आघाडी करण्याचा अधिकार आहे. निवडणुका जशा जवळ येतील, तशा अनेक घटना दिसतील. त्यामुळे मी सर्वांनाच शुभेच्छा दिल्या आहेत, असे एकनाथ शिंदे म्हणाले. राज ठाकरे यांनी मराठीबद्दलची तळमळ बोलून दाखवली. उद्धव ठाकरे यांनी स्वार्थाचा झेंडा आणि सत्तेचा अजेंडा बोलून दाखवला. त्यामुळे पोटातील ओठावर आले. मराठी माणसांचा अपेक्षाभंग झाला आहे, असेही एकनाथ शिंदे म्हणाले.

## मला बाळासाहेबांचे आशीर्वादच...

मानतो. त्यांनी दोन बंधू एकत्र आणण्याचे श्रेय मला दिले. श्रद्धेय बाळासाहेबांचे आशीर्वाद हे मलाच मिळत असतील. पण मला असे सांगण्यात आले होते की, तिकडे विजयी मेळावा होणार आहे. पण त्या ठिकाणी रुदालीचे भाषण झाले. मराठीवर एक शब्दही न बोलता, आमचे सरकार गेले, आमचे सरकार पाडले, आम्हाला सरकारमध्ये न्या, आम्हालाच निवडून द्या असे म्हटले गेले. हा मराठीचा विजयोत्सव नव्हता, ही रुदाली होती. या रुदालीचे दर्शन आपल्याला त्या ठिकाणी झाले.

मुळात मुंबई महापालिका २५ वर्षे त्यांच्या ताब्यात होती. त्यानंतरही त्यांना दाखवण्यासारखे एकही काम करता आले नाही. पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात आम्ही मुंबईचा चेहरा बदलला. त्यांच्या काळात मराठी माणूस मुंबईतून हद्दपार झाला. उलटपक्षी आम्ही बीडीडी चाळीतील मराठी माणसांना, पत्राचाळीतील मराठी माणसांना, अभ्युदय नगर येथील मराठी माणसांना त्याच ठिकाणी हक्काचे मोठे घर दिले. याची असुया त्यांच्या मनामध्ये आहे.

ये पब्लिक है सब जानती है. त्यामुळे मुंबईतील मराठी असो की अमराठी माणूस असो, सर्वच आमच्यासोबत आहेत. आम्ही मराठी आहोत. आम्हाला मराठी असल्याचा अभिमान आहे. मराठी भाषेचा अभिमान आहे. पण त्याचवेळी आम्ही हिंदू आहोत. आम्हाला हिंदुत्वाचा अभिमान आहे. आमचे हिंदुत्व हे सर्वांना सोबत घेऊन चालणारे आहे, असेही देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी ठणकावून सांगितले.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची...

विधि महाविद्यालयाला देदीप्यमान शैक्षणिक वारसा लाभला असून अनेक नामवंत विधिज्ञ या महाविद्यालयाने घडविले. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी या महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून १९३५ मध्ये अध्यापन कारकीर्दीस सुरुवात केली. न्यायशास्त्रासारख्या अत्यंत गहन विषयाचे अध्यापन डॉ. आंबेडकर करीत असत. या महान कार्याला ९० वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या गौरवार्थ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विधि सेवा क्षेत्रात महाविद्यालयाच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असल्याचेही वैद्य यांनी सांगितले.

या कार्यक्रमास सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती हेमंत गोखले, न्यायाधीश रेवती ढेरे, न्यायाधीश नीला गोखले, कुलगुरू डॉ. दिलीप उके, कुलगुरू डॉ हेमलता बागला, कुलगुरू डॉ अपूर्वा पालकर, कुलगुरू डॉ. गोसावी, प्रधान सचिव सुवर्ण केवले, सिनियर कौन्सेल रफिक दादा, बार कौन्सिल अध्यक्ष विठ्ठल कोंडे-देशमुख, प्रिन्सेस आशाराणी गायकवाड व मान्यवर उपस्थित होते.